
# चैतन्य लहरी


अंक क्र. ७,८

जुलै - ऑगस्ट २००२











## अनुक्रमणिका


गुरू साक्षात परब्रह्म ........ २

आदिशक्ती पूजा, कबेला, २३ जून २००२ ........ ३

ईस्टर पूजा, इस्तंबुल, २१ एप्रिल २००२ ........ ७

श्री येशूंची आरती ........ ११

दहा गुरुंची अवतरणे ........ १२

संत कबीर ........ १४

नाभि चक्र : प. पू. श्री माताजींचा उपदेश ........ १५

अमृत वाणी : गरुपद ........ १६

बायबल मधील काही वचने ........ १७

सहजयोगामधील प्रगतीची वाटचाल ........ १८



संपर्क :


चैतन्य लहरी

सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्वे नंबर ९८, भुसारी कॉलनी , कोथरुड, पुणे -४११ ०३८

टेलिफोन : ०२०-५२८ ०६६८, ५२८ ६१०५ इमेल : chaitanyalaharipune@rediffmail.com


सुचना :-

सहजयोगी बंधू-भगिनींना नम्र विनंती सन २००२ चैतन्य लहरी अंकासाठी नविन सभासद नोंदणी बंद केलेली आहे. तरी यापुढे ज्या लोकांची वर्गणी येईल ती पुढील सन २००३ या वर्षासाठी जमा केली जाईल. कृपया नोंद घ्यावी.



# गुरु साक्षात् परब्रह्म

गुरुची महति अनेक साधु-संतांनी पुरातन कालापासून सांगितली आहे. आपल्याला ज्ञान नाहीं, जे काही आहे ते अज्ञान आहे हे कळण्यापासून आपली परमार्थाची वाटचाल सुरु होते. परमात्म्याबद्दल भाव असला तरी त्याची प्रत्यक्ष अनुभूति मिळेपर्यंत आपल्याला ज्ञान होत नाहीं. आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्याशिवाय ही अनुभूति प्राप्त होणें शक्य नसते. म्हणूनच जो आत्मसाक्षात्कार देतो तोच आपला सद्गुरु असतो आणि असा गुरु साक्षात् परमेश्वरच असतो. म्हणूनच गुरुची स्तुति सर्व संतांनी मुक्तकंठाने केली आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपले समस्त ज्ञान सर्व कर्तृत्व, इतकेच नव्हे तर ज्ञानेश्वरी लिहिण्यातील प्रतिभा हे सर्व गुरुकृपेनेंच प्राप्त झालेले आहे असे वारंवार सांगितले; ज्ञानेश्वरीमधें त्याचा जयघोष केला आहे.

आपणा सर्व सहजयोग्यांचे परम भाग्य हेच की साक्षात् आदिशक्ति आपल्याला गुरु म्हणून लाभल्या आणि त्यांच्या कृपेनें कुण्डलिनी जागृतीमधून आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळाला. एवढेंच नव्हे तर प्रेम, करुणा व क्षमा या ऐश्वर्यानें ओतपोत भरलेल्या मातृहृदयांतून प.पू.श्रीमाताजी आपला स्वीकार करतात, आपला सांभाळ करतात व आपल्याला अध्यात्मिक उन्नतीच्या मार्गावर अग्रेसर होण्यासाठी मदत करतात आणि स्वत: अविश्रांत मेहनत घेतात. पूर्वीच्या काळी गुरु शिष्याकडून कठोर तपश्चर्या करवून घेत, त्याची कसोटी घेत पण श्रीमाताजींच्या हृदयात प्रेमाचा सागर असल्यामुळें फक्त प्रेमापोटी आपल्याला त्या मार्गदर्शन करतात.

म्हणूनच श्रीमाताजींचे शिष्य म्हणून आपली जबावदारी आपणच, सूज्ञता बाळगून, ओळखली पाहिजे. आत्मसाक्षात्कार मिळाला म्हणजे योग मिळाला, पण खऱ्या अर्थाने सहजयोगी बनण्यासाठी प्रत्येक सहजयोग्याने स्वत: गुरुपद मिळवले पाहिज, स्वत: गुरु म्हणवून घेण्याची पात्रता मिळवली पाहिजे असे श्रीमाताजी सांगत असतात. ह्याच अर्थाने आपला पुनर्जन्म झाला आहे व त्यासाठी कुण्डलिनी, चक्र, नाडी-संस्था, चक्रांची स्वच्छता, ध्यान, आत्मपरिक्षण, कार्य इ. सर्व बाबतीत आपण सतर्क राहून गुरुपद मिळवण्याचा ध्यास घेतला पाहिजे. गुरु हा कालातीत , गुणातीत व धर्मातीत असतो या एका वाक्यांत श्रीमाताजींच्या उपदेशाचे सार आहे व त्याचे आपण पालन केल्यावरच त्या प्रसन्न होणार आहेत हे भान आपल्यामधें मुरले पाहिजे.

'गुरु एक परब्रह्म ऐसे जया कळले वर्म' ही भावना जिवंत ठेऊन आपण सर्वजण प.पू.श्रीमाताजींच्या चरणकमळी नम्रपणें वचनबध्द होऊं या.



# श्री आदिशक्ति पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)
कबेला, इटली, २३ जून २००२

तुम्हाला सहजयोगातून मिळालेली शक्ति कार्य करण्यासाठी आहे. सकारात्मक विचार करून, आक्रमकपणा न दाखवता सामुहिक स्तरावर कार्याला लागा.

आजची पूजा ही तुम्हां सर्वांच्या दृष्टीने एक वेगळी पूजा आहे; कारण ही आदिशक्तीची पूजा आहे. आदिशक्ति ही संपूर्णतया परिपूर्ण आहे. तुम्हाला श्रीगणेशांपासून आलेली डावी बाजू आणि उत्थानप्रक्रियेतून डाव्या बाजूवरील सर्व चक्रे यांची माहिती आहे. उजव्या बाजूबद्दल मी जाणूनबुजून तुम्हाला कांहीं सांगितले नव्हते. कारण उजव्या बाजूकडे गेलेले लोक हरवून गेले; ग्रंथांमधून त्यांना गायत्री-मंत्र मिळाला पण त्याचा अर्थ त्यांना समजला नाहीं; त्यांनी तो मुखोद्गत केला. त्यामुळे ते उजवीकडे झुकले व आज्ञा चक्रावरच अडकले. ते आत्मसक्षात्काराची धडपड करत होते आणि त्यांना असे सांगण्यात आले होते की उजव्या बाजूवरील कार्य नीट चालूं ठेवले तर त्यांना आत्मसाक्षात्काराचे परमोच्च ध्येय गाठतां येईल.

पण त्या प्रयत्नांत कुणीच यशस्वी झाले नाहीं; बरेच जण फार तापट स्वभावाचे, शीघ्रकोपी बनले आणि उजव्या बाजूवरील साधना केल्यामुळें दुसऱ्यांना शाप देणें, भस्मसात करणें इ. सिध्दिच फक्त मिळवूं शकले; त्याचा कुण्डलिनी-जागृतीशी कांहीच संबंध नव्हता. याला कारण म्हणजे त्यांची उन्नति आज्ञा चक्राशी थांबली आणि ते अज्ञानाच्या अंधकारांत नाहींसे झाले. तसेच अनेक पुस्तके , ग्रंथ लिहिले गेले पण उजव्या बाजूमधून उत्क्रांतीच्या मार्गावरील प्रवास खडतर व धोकादायक असतो हे लक्षांत न घेता हे ग्रंथ लिहिले गेले. सगळ्यांत उत्तम मार्ग म्हणजे कुण्डलिनी जागृत करणें; जागृत झाल्यावर ती तुम्हाला मध्यमार्गातून चक्रांच्या बरोबर मधून, आज्ञाचक्र पार करुन सहस्त्रारापर्यंत पोचवते आणि त्याचे भेदन करून बाहेत येते.

सहस्राराचे ज्या ठिकाणी भेदन केले जाते त्याला ब्रह्मरंध्र म्हणतात व त्याचे महत्त्व आतां मी तुम्हाला समजावते. लहान मुलाचा जन्म झाल्याबरोबरच्या वेळी त्याचा टाळूचा भाग थडथड असा उडत असतो. आत्म्याचा शरीरामधें याच ब्रह्मरंध्रातून प्रवेश झालेला असतो आणि थोड्या दिवसांत तो भाग टणक होऊन आत्मा तुमच्या हृदयांत येतो. म्हणून तुम्ही आत्मसन्मुख होण्याचा सतत प्रयत्न करत राहिले पाहिजे. कुण्डलिनी सहस्रारांत येणे हीच एक मोठी समस्या होती. तांत्रिक मंडळी उजवी बाजू वापरून तो प्रयत्न करत राहिल्यामुळें काळी विद्या, तंत्रमार्ग इ. करत गेले आणि त्यांची डावी बाजू प्रभावित होत गेली.

त्यामुळें उजव्या बाजूचे लोक तापट, महत्त्वाकांक्षी, आक्रमक बनत गेले आणि शाप देऊन लोकांना ठार मारण्याची प्रवृत्ति वाढत गेली. त्यांतून कुणावरही प्रभुत्व गाजवण्याचे व दुसऱ्याचा काटा काढण्याचे प्रकार वाढत गेले. ब्राह्मण व थोडया फार प्रमाणांत क्षत्रिय लोक असे उजव्या बाजूचे होते; त्यातून ते शक्तिशाली झाले. पण सर्वत्र आपलीच सत्ता स्थापण्याच्या मागे लागले आणि प्रसिध्दीला आले. खरे तर ते तसे नव्हते; तापट व्यक्ति अध्यात्मिक असूं शकत नाहीं; पण उजवी बाजू वापरूनच ते होणार अशा समजुतीमधें राहिले;




आणि उजवीकडील सात चक्रे त्यांनी मानली. ती म्हणजे भू. भुव:, स्वहा, मन: जना:, तप; तप: म्हणजे आज्ञा, तिथे मध्यभागी ख्रिस्त आहेत; डावी बाजू म्हणजे जैन धर्म व उजवी बाजू म्हणजे ख्रिश्चन धर्म; हे खरे तर उत्थानाचे धर्म नसून सत्यशोधनाच्या उर्जेचे वेगळे प्रवाह आहेत.

हे सर्व भारतामधें प्रदीर्घ काळ चालूं होते. सर्व गुरु, साधु-मुनी, तपस्वी हजारो वर्षांपासून हेच करत आले. पण शेवटापर्यंत कुणीच पोचले नाहींत. तपस्वी लोक शाप देण्यांत मग्न होते, नजरेच्या एका कटाक्षामधूनही समोरच्या व्यक्तीला जाळून टाकणें ते सहज करु शकत होते. पण त्यापैकी कुणालाही आत्मसाक्षात्कार मिळवता आला नव्हता. भारत, ग्रीस, ईजिप्त, इंग्लिश, जर्मन, रोमन या सर्व इतिहासांत दुसऱ्यावर आक्रमण करणें, दुसऱ्यांची जमीन-मालमत्ता बळकावणें इ. सत्तापिपासूपणाची अनेक उदाहरणे सापडतात. आक्रमकपणा व हत्या हे प्रकार पराकोटीला पोचले होते; मानवजातीवर जुलूम झाले. जणूं एक राक्षस-वंशच प्रबळ झाल्यासारखे वाटावे. आज्ञाचक्रावर तर येशू ख्रिस्तांना ठार मारले गेले. त्याप्रमाणें अनेक साधु-संतांचा, अवतरणांचा छळ झाला. श्रीरामांच्या कालापासून इतिहास हेच दाखवतो. अलिकडचे उदाहरण म्हणजे हिटलर; निर्दयपणाची त्याने कमाल केली, बेसुमारपणे लोकांची त्याने कत्तल करवली. पृथ्वीतलावर असे एकामागून एक भयानक राक्षस आले आणि जगभरांत अशांतीचे साम्राज्य निर्माण झाले. उजव्या बाजूकडून उन्नतीच्या मार्गावरील या प्रभावानें अध्यात्मिक उन्नति दूरच राहिली. त्या काळांत साधु-संताचे व अवतारी महात्म्यांचे रक्षण झाले हाहि एक चमत्कारच होता.

म्हणून मी कुण्डलिनीचा विचार करु लागले. कुण्डलिनीची जागृति हाच एक उपाय आहे हे लक्षांत आले आणि त्यासाठींच आपण पृथ्वीतलावर मानवजन्म घेतला आहे हे मला पूर्णपणे ठाऊक होते. त्यातूनच उजवी-डावीकडचे मार्ग सोडून मानव मध्यमार्गावर येऊ शकेल याची मला खात्री होती. पण मी तुम्हाला डाव्या बाजूचे सर्व ज्ञान व कुण्डलिनी जागृत करण्याची क्षमता दिली. त्यातून तुम्ही तुमच्या सहस्राराचे भेदन करुं शकला आणि सत्याच्या परमानंदाच्या साम्राज्यांत प्रवेश करु शकला. मध्यमार्गावरील पहिले म्हणजे मूलाधार चक्र जागृत झाल्यावर तुम्ही शुध्द झालात, पूर्णपणे पवित्र झालात; तुमच्या नजरेतही पावित्र्य आले, वाममार्गाकडे वळेनासे झालात व उथळपणाच्या सर्व सवयी सोडून संत-पुरुष झालात. तसे झाल्याशिवाय तुम्हाला सहजयोग मिळत नाहीं. सहजयोगी उच्छृंखल, उथळ, स्वैराचारी, पैसे लुबाडणारा वा आक्रमक असूं शकत नाहीं. असे घाणेरडे लोक सहजयोगांतून बाहेर फेकले जातात; त्यांतल्या कांहींना त्याचा राग येतो व ते आपले दात विचकूं लागतात तर कांहीं जणांना आपल्या चुका कळतात. म्हणून सर्वप्रथम तुम्ही शुध्द व चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व मिळवले पाहिजे व त्याचा सन्मान राखून आनंद मिळवला पाहिजे. डाव्या बाजूवरचे पहिले मूलाधार चक्र, जिथे श्रीगणेश आहेत, जागृत झाल्यावर हे घटित होते.

पुढच्या टप्प्यावर, स्वाधिष्ठानवर कलानिर्मितीमधें आक्रमकपणा येऊ लागला. उजव्या बाजूच्या प्रभावाखाली कलेमधेंही लोक वाट्टेल त्या हीन अभिरुचीची निर्मिति प्रसिध्दि मिळवण्याच्या नादापायी करु लागले. हा स्वाधिष्ठानच्या उजव्या बाजूवरचा दोष आहे. अवतारी पुरुषांनासुध्दा हिडीस प्रकारे दाखवायला त्यांनी कमी केले नाहीं. त्याचप्रमाणे नाभिचक्रावर लोक पैसा कमावण्याच्यामागे लागले व पैशाच्या मोहापायी फसवणूक करुं लागले. भारतासारख्या देशांमधें पैशासाठी फसवणूक करण्याची वृत्ति होती तर उजव्या बाजूवरच्या देशांमधें पैसा आक्रमकपणें वापरुन सत्ता कमावण्याची. ह्या सर्व दुष्कृत्यांमुळे त्यांचेच नुकसान होणार आहे, ते नष्ट होण्याच्या स्थितीला येतील आणि मग त्यांना समजेल की पैसा हा विधायक कार्यासाठीं, समाजामधें प्रेम व शांतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी केला पाहिजे. हेच उजव्या बाजूचे लोक हृदय चक्रावर मातृहृदयाची थोरवी विसरले; मुलांवर प्रेम करण्याऐवजी त्यांच्यावर आक्रमकपणें अधिकार गाजवूं लागले; मग मुलांसाठी कांहीं स्वार्थत्याग करणें दूरच राहिले. माताही नवऱ्यावर, मुलाबाळांवर अधिकार गाजवू लागल्या व आक्रमक बनल्या.

पृथ्वीतलावर जन्म घेतल्यावर ही सर्व परिस्थिति पाहून मला धक्काच बसला व या मणसांना कसे सुधारणार हा मोठा प्रश्न मला पडला. नाभीचक्रावरच त्यांची प्रगति थांबली होती. हृदयचक्रावरची



स्थिति वर सांगितली पण विशुध्दि चक्रावरही लोक सबंध जग पादाक्रान्त करण्याच्या, जगभर आपलेच साम्राज्य स्थापण्याच्या मागे लागले होते. माणूसपणाच्या भावनाच नसल्यासारखे व्यवहार चालले होते. सत्तेचा अधिकार गाजवणारे आणि सत्तेच्या गुलामीखाली भरडले जाणारे अशा दोनच जाति राहणार अशी परिस्थिति होऊं लागली होती. पण सुदैवाने सामूहिक कल्याणकार्य करण्याचा प्रयत्न कांहीं संस्था चालवीत आहेत व सुधारणा होण्याची चिन्हे दिसत आहेत; पण त्यांनाही म्हणावे तेवढे यश आल्याचे दिसत नाहीं. कारण ते लोकही स्वत:ला सुधारण्याचा, स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न न करतां दुसऱ्यांवर प्रभाव पाडण्याच्या प्रयत्नांत आहेत. या सर्व कारणांमुळे या चक्राचे कार्यही बिघडले आहे.

व्यापक स्तरावरची परिस्थिति पाहिली तर सगळीकडे लढाया, युध्द, विध्वंस चालू आहे व मोठ्या प्रमाणावर सामान्य माणसे प्राण गमावत आहेत. जगांत अध्यात्मिक उंचीवर आलेले लोक नाहींत असे नाहीं पण कांही ना कांहीं कारणानें ते लोक स्वत:च्या साधनेमधें रमले आहेत आणि शांतीचा आनंद घेत आहेत. पण ती शांति आजुबाजूला सर्वत्र पसरली पाहिजे व त्यासाठीं कार्यतत्पर झाले पाहिजे. स्वत:पुरती उन्नति मिळवून त्यांत समाधान न मानता इतरांनाही उन्नतीपथावर आणले पाहिजे व ते कार्य जोमाने हाती घेतले पाहिजे. आपल्याला जगभरातील लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणायचे आहे. माझ्या दृष्टीनें कार्य करायचे ते मी करेनच पण तुम्ही त्यासाठीं प्रत्यक्ष काय करता हे जास्त महत्त्वाचे आहे. सहजयोगातून आपले किती चांगले झाले एवढयावरच संतुष्ट राहिलात किंवा अहंकारामुळे आज्ञाचक्रावरच राहिलात तर उपयोग नाहीं. आजकाल हाच एक मोठा अडथळा सगळीकडे दिसत आहे; ज्यांनी ज्यांनी अध्यात्मिकतेची उंची व गहनता मिळवली आहे त्यांनी त्याचाच आनंद उपभोगण्यांत, पूजासारख्या प्रसंगांत निष्ठेने भाग घेण्यात समाधानी न राहतां सामुहिक स्तरावर परिवर्तनाच्या कार्यामधें भाग घेतला पाहिजे. कांहीं थोडे फार कार्यरत आहेत पण बरेचसे त्याबाबतीत शिथिल आहेत. म्हणून माझे मुद्दाम सांगणे आहे की आत्मपरीक्षण करुन तुम्ही प्रत्येकाने आपण सामूहिक स्तरावर किती कार्य करतो, किती लोकांना सहजयोग सांगतो इकडे लक्ष द्या. खिस्तांजवळ फक्त बारा शिष्य होते. पण तुमच्या मानानें त्यांनी प्रचंड कार्य केले. म्हणून तुम्ही उजव्या बाजूमधून कार्यप्रवण व्हा; नुसते शांत, संयमी, एकान्तप्रिय असे कुचकामी बनू नका. सहजयोगाचा हा उद्देश कधींच नव्हता; उलट जास्तीत जास्त लोकांमधें परिवर्तन घडवून आणणे हे सहजयोगाचे ध्येय आहे. हे कार्य करणाऱ्यांचे पाठीमागे माझे आशीर्वाद सदैव राहणार आहेत. आपापल्या देशामधें आपण किती लोकांना सहजयोगांत आणले हे तपासून पहा.

याशिवाय तुम्ही पूर्णपणें योग प्राप्त करुं शकणार नाहीं. फक्त डाव्या बाजूवरचे प्रेमळ, दयाळु पण अर्धेकच्चे योगी व्हाल. याचा अर्थ तुम्ही महत्त्वाकांक्षी व आक्रमक बना असा मुळींच नाहीं. मी कधीं पाहते कीं कांहींजण लीडर बनून फार मोठे कांहीं कार्य करुन दाखवण्याच्या मागें असतात; पण त्यांनीही आधीं आपण किती जणांना जागृति दिली आहे हे पहावे. उलट विमानप्रवासामधें किंवा रस्त्यावर कांहीं सहजयोगी नवीन लोकांना सहजयोग सांगत असल्याचे मला दिसून आले आहे; तर कांही ठिकाणी स्वत:चा मोठेपणा व शहाणपणा मिरवण्यासाठीं सहजयोगाचा वापर करणारेही मी पाहिले आहेत. तुम्हाला जे सहजयोग मिळाला आहे तो अधिकाधिक लोकांना आत्मसाक्षात्कार मिळवून देण्यासाठी आहे.

विशेषत: सहजयोगातील युवाशक्ति मुला-मुलींना माझे आग्रहाचे सांगणे आहे की त्यांनी आपली सहजशक्ति साध्या व बिनकामाच्या गोष्टींमधें वाया न घालवता सहजयोग प्रचार व प्रसार कार्याकडेच लावली पाहिजे. शाळा चालवायच्या, आश्रम चालवायचे किंवा त्यासारखी इतर कामे करायची यामधें जास्त रस व वेळ खर्च न करता सहजयोगाच्या प्रसारासाठी वेळ व शक्तीचा वापर करा. अधिकाधिक नवीन सहजयोगी तयार करणे हे युवाशक्तीचे काम आहे. याचाच अर्थ उजवी बाजू काम करत नाहीं; त्यांनी उजव्या बाजूवर यायला हवे.

सहजयोगांत तुमचे पूर्णपणें संरक्षण केले जाते; कुणीही तुम्हाला त्रास देणार नाहीं, छळणार नाहीं किंवा ठार मारणार नाहीं हे मी निक्षून सांगते. तुम्हाला मिळालेल्या शक्ति तुम्ही वापरल्या नाहींत तर मधेंच अडकून रहाल. म्हणून उजवीकडची शक्ति महत्त्वाची आहे व ती वापरली पाहिजे. पुढच्या वेळेस मी तुम्हाला उजव्या बाजूबद्दल



सांगेन, उजव्या बाजूला काय काय आहे ते सांगेन; आतां तुम्ही कितीही प्रयत्न केलात तरी डाव्या बाजूवर येणार नाहींत. म्हणून उजव्या बाजूचे कार्य योग्य दिशेनें व समजूतदारपणे केले पाहिजे; आक्रमकपणे किंवा न समजतां कसेही करुन चालणार नाहीं. तसे सहजयोगांतही कांहीं हिटलर प्रवृत्तीचे लोक आहेत. पण आताची वेळ अशी आहे की पूर्वीच्या काळी संतांनी केलेल्या कार्यापेक्षांही खूप कांही तरी तुम्हाला करायचे आहे. म्हणून सहजयोग स्वत: पुरता ठेवू नका किंवा कुटुंबाकरतां मर्यादित ठेऊ नका तर त्याचा खूप प्रसार करा.


सहजयोगामधून आपल्याला सर्व जग बदलायचे आहे. त्या दृष्टीने तुम्ही कुठे आहांत, सहजयोगासाठी तुम्ही काय केले व करत आहांत हे पहा. आज्ञाचक्रावर कांहीं सहजयोगी असे होतात की ते कांहींही सहन करतात किंवा कसल्याही यातना सहन करतात; त्याच्या ऐवजी आपल्याला दुसऱ्यांची दु:खे व यातना दूर करायच्या आहेत. पण त्याप्रकारची व्यवस्था किंवा जाणीव आपल्याजवळ नसते. ते झाले तर तुम्हीही पार बदलून जाल. नाहीतर संत-साधूंसारखे तुम्ही आश्रमांत निवान्तपणें बसूनच राहता. म्हणून सकारात्मक विचार करुन व आक्रमकता न ठेवतां कांहीतरी कार्य हातात घ्या. आपल्याकडे कांही आक्रमकवृत्तीचे, दिखाउपणा करणारे सहजयोगी आहेत हे मी पण जाणते; पण सामूहिक स्तरावर कार्याला लागलात की आपण कुठें कमी पडतो वा आपण काय चुका करतो ते तुमच्या लक्षांत येईल. हे फार महत्त्वाचे आहे आणि कारण इथेंच बरेच सहजयोगी घसरतात. आज्ञा चक्रासाठीं क्षमा करणें महत्त्वाचे असले तरी दुसऱ्यांनी चुका केल्या तरी चालवून घ्या असा त्याचा अर्थ नाही; उलट जो चूक करतो त्याला त्याची चूक स्पष्टपणें दाखवून दिली पाहिजे. हे न करणे अगदीं अयोग्य आहे व त्यासाठीं तुम्ही तडजोड मुळींच करतां कामा नये; तसे कराल तर तुमच्या आत्मसाक्षात्काराला अर्थ उरणार नाहीं.

तेव्हां तुम्ही हें नीट लक्षांत घ्या की तुम्हाला व्हायब्रेशन्स येतात, तुम्ही ध्यान वगैरे करता, दुसऱ्याचे आजार ठीक करु शकता एवढ्यावरच थांबू नका तर सहजयोगाचा प्रसार करा. लोकांना, शेजार-पाजाऱ्यांना सहजयोग सांगा, त्याचे कार्यक्रम करा. आपण एवढ्या मोठया संख्येने आहोत पण त्यामानानें प्रचार व प्रसार कमीच होत आहे. म्हणून या कार्यासाठी तुम्ही काय - काय करुं शकता, कुठे, व कसे कार्य करुं शकता याचा नीट विचार करुन कार्याला लागा. तुम्ही सहजयोग चांगल्या तऱ्हेने सांगता, चांगली गाणी म्हणता पण तुम्ही किती लोकांना सहजयोगांत आणले यावरच त्याला अर्थ येणार आहे. टर्कीसारख्या मुस्लिम देशांत २५००० सहजयोगी आहेत. ते फारसे श्रीमंत नसतील पण त्यांना आत्मसाक्षात्काराची महति समजली आहे म्हणून स्वत:चेच प्रश्न व स्वत:लाच त्रास देणारे लोक याचाच विचार करत राहण्याऐवजीं आपल्यासारखी शक्ति दुसऱ्यांनाही कशी मिळवून देता येईल याचा जास्त विचार करा. सहस्रारांत आल्यावर तुमच्याजवळ अनेक शक्त्या आहेत. स्वत:पुरताच सहजयोग करणे स्वार्थीपणा आहे. म्हणून स्वत:चे नांव, प्रसिध्दि, कीर्ति वाढवण्याच्या मार्गे लागण्याऐवजी जास्तीत जास्त लोकांना सहजयोगांत आणण्याच्या कार्याला जोमाने व उत्साहाने लागा.

मला असेही तक्रारीच्या सुरांत सांगितले जाते कीं बरेचसे सहजयोगी मेलेल्या माणसासारखे थंड आहेत; तुम्ही खरेच तसे आहात का? मी एकटी महिला एवढे प्रचंड कार्य करुं शकते तर तुम्ही कां नाहीं करुं शकत, आपापल्या देशांत तरी सगळीकडे जाऊन सहाजयोग पसरवण्याचा प्रयत्न कां नाहीं करत? जरा विचार करा. जोपर्यंत तुम्ही हे करुं शकणार नाहीं तोपर्यंत तुम्ही 'संपूर्ण' बनूं शकणार नाहीं आणि आदिशक्तीची शक्ति तुम्ही यथार्थपणें समजूं शकणार नाहीं. आजच्या या आदिशक्ति- पूजेच्या दिवशींच मी म्हणूनच तुम्हांला सांगत आहे की माझ्या संपूर्ण स्वरूपाची पूजा झाली पाहिजे; फक्त एकाच, डाव्या बाजूच्या शक्तीची पूजा करता येत नाहीं. तसे झाल्यावरच त्याचे सर्व आशीर्वाद तुम्हाला मिळणार आहेत. म्हणून सहजयोगाचा नुसताच प्रसार करुन चालणार नाहीं तर लोकांना सहजयोगांत उतरवले पाहिजे. त्यासाठीं तुम्हाला माझे सर्व आशीर्वाद, प्रेम व शक्ति देते. कार्याला लागा.

सर्वांना अनंत आशीर्वाद





# ईस्टर पुजा

प.पू. श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)
इस्तंबूल - टर्की २१ एप्रिल २००२

मानवाचे पुनरुत्थान हा श्री खिस्तांचा संदेश आहे. त्यांची प्रेम व करुणा शक्ति मिळवून सशक्त सहजयोगी व्हा आणि देवतेचे आशिर्वाद मिळवा.

आज येथे जीझस ख्राइस्ट व माता मेरी यांची पूजा करण्यासाठी आपण जमलो आहोत.

ख्रिस्तांची आई येथे आली आणि तुर्कस्थानात वास्तव्य केले हा एक मोठा योगायोग आहे. खिस्तांना सुळावर चढविल्यानंतर त्यांचे येथे येणे आणि रहाणे हे आश्चर्यच नाही का? नंतर आईबरोबर ते येथे घेऊन गेले असतील. असे म्हटले जाते की ते काश्मीरला गेले व त्यांचेबरोबर त्यांची आईही होती. जाता जाता ते तेथे गेले असण्याची शक्यता आहे.

आज आपण त्यांचे पूजन करणार आहोत. सहजयोगाला अनुसरुन मेरी माता महालक्ष्मीचाच अवतार होत्या; त्यांनी आपल्या मुलाचा धर्मकारणासाठी त्याग केला. पण त्याची किंम्मत लोकांना समजली नाही. दुर्दैवाने त्यांचे दैवी व्यक्तित्व कोणालाच ओळखता आले नाही. ज्यांनी ख्रिस्तांना जन्म दिला अशा महान व्यक्तीची ओळख सहजयोगातूनच समजते. त्यांचा कोणी, विशेषत: इस्लामी जगतात आदर केला नाही हे मोठे दुदैवच. यामुळेच इस्लामी संस्कृतीत स्त्रियांचे स्थान गौण आहे; त्याबद्दलचे अनुभव काही चांगले नाहीत. आम्ही परित्यक्त स्त्रियांच्या पुनर्वसनासाठी संस्था काढली. त्यात विशेषत: मुस्लिम स्त्रियांची संख्या जास्त आहे, ही दु:खाची बाब आहे. मोहम्मदांनी सांगून ठेवले, 'तुम्ही मातेचा सांभाळ करा', तरीसुध्दा आठ-दहा मुले असणाऱ्या मातांची अशा संस्थेत संख्या जास्त आहे. तरीही संस्थेने त्यांना सामावून घेतले. क्षुल्लक अशा धार्मिकतेकडे आम्ही दुर्लक्ष करुन त्यांना स्वीकारले. सर्वात महत्वाचे म्हणजे 'मानव धर्म'; आम्हाला सर्व धर्मांना एकत्र बांधायचे आहे. हे कठिण काम आहे कारण एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माच्या लोकांचा आदर करत नाहीत. हे सर्व विक्षिप्त वाटते. हा सद्भाव कोठेच दिसत नाही, ते प्रेम नाही. उलट सर्व एकमेकांशी भांडतात, झगडतात, हिंसाही करतात. देवाच्या व धर्माच्या नावावर हे जे चालले आहे, लोक एवढे क्रूर बनले हे सर्व मूर्खपणाचे, दु:खकारक आहे.


यावर एकच तोडगा, सर्वांना आत्मसाक्षात्कार देणे. ज्याला कुराणात 'मिराज' म्हटले आहे. पण ते हा 'मिराज' कुणालाही मिळणार नाही असे सांगतात. मोहम्मदसाहेबांना आत्मसाक्षात्कार प्राप्त होता, इतर कोणालाही नव्हता, पण याचा अर्थ त्या लोकांना त्याचा प्रतिबंध केला असे म्हणणे चुकीचे आहे. आत्मसाक्षात्कार हा सर्वांकरिता आहे. मग ते आफ्रिकेतील, इंग्लंडमधील, भारतातील व अमेरिकेतील कुठलेही असतील. त्यांना सर्वांना 'मिराज' मिळू शकेल. मानवाला एकमेकाविरुध्द लढण्यासाठी निर्मिलेले नाही. जनावरे कधीही आपापसात भांडत नाही. मग माणसे का भांडतात? तेही धर्माच्या नावाखाली ! ख्रिस्तांचे अवतरण धमाचे एकत्व मिळविण्यासाठी झाले, पण ख्रिश्चन भांडू लागले, दुसऱ्यावर वर्चस्व करु लागले. परमेश्वराच्या व धर्माच्या नावावर भांडणे करू लागले, जगात एक प्रकारचा हा गोंधळच आहे.

आमचा धर्म हा वैश्विक आहे. एकच धर्म. आम्ही सर्व देव-देवतांचा मान राखतो, आदरभाव ठेवतो व त्यांची पूजा करतो, त्यांच्यातील एकत्व न समजण्या इतके आम्ही

अडाणी नाही. आणि आत्मासाक्षात्कारानंतर ते सर्व आमच्या मध्यवर्ति मज्यासंस्थेवर, आमच्या चक्रांवर आधिष्ठित आहेत. केवळ लोक इतिहास सांगतात म्हणून त्यांचे अस्तित्व आपल्या आत आहे म्हणून नव्हे तर ते एकत्रित विश्वाच्या उत्थानासाठी कार्यरत आहेत हे महत्त्वाचे.


पुनरुत्थान तेही स्वत:च्या देहासहित हा ख्रिस्तांच्या जीवनाचा गाभा आहे. त्यासाठी त्यांना अनेक यातना व अनेक दिव्यांना सामोरे जावे लागले. सहजयोग हा त्याच धर्तीवर आहे. आत्मसाक्षात्कार अर्थात उत्थानानंतर तुमच्या चुकीच्या कल्पना, पूर्वग्रह दूर होऊन, एका विशेष जाणीवेत तुम्ही उतरता. हे सर्व घडवणे खडतर होते. भारतात किंवा कोठेही लोक अज्ञानाच्या अंधारात व एकमेकांच्या हेवेदाव्यात अडकले होते. ही द्वेष भावना भारतात नव्हे तर बाहेरही होती जसा 'हिटलरचा उदय' केवळ मानवजातीच्या हेटाळणीसाठी जणू हिटलरचा जन्म होता. सैतानी शक्तीच्या या अवताराने भयंकर अनाचार घडविला. ज्या तऱ्हेने त्याने मानवहत्या केली, तसा विचार कुठल्याही मानवात असणार नाही. लहान बालके, म्हातारे- कोतारे यांची गॅस चेंबरमधे अगदी निर्घृण हत्या केली. मी त्या जागेला भेट देऊ शकले नाही आणि ते मानवणारे नव्हते. पण माझे यजमान तेथे जाऊन आल्यानंतर सात दिवस आजारी होते. या सर्व त्याच्या कल्पना अमानवी विकृतीचा नमुनाच असावा. ज्यू लोकांना पकडून ठार मारण्यामागचा त्याचा हेतू अगम्यच होता. अशा अनेक विकृत घटना धर्माच्या नावाखाली घडल्या, सगळे काही; भयंकर. खरे तर धर्म हा तुम्हाला प्रेम करण्यास सांगतो. द्वेषभावना व हिंसाचार नव्हे. अजूनही हे सर्रास चालू आहे याचे आश्चर्य वाटते. केवळ सहजयोगच हा मूर्खपणा थांबवू शकेल. कारण शेवटी आपण सर्व मानव आहोत.

यासाठी ख्रिस्तासारखे तुम्ही तुमचे उत्थान घडवा आणि हे सहजयोगाद्वारेच शक्य आहे. मोहम्मदसाहेबांनी याला 'मिराज' असे संबोधले. पण ते कोणाला हवे? आणि याचा तिरस्कारच केला गेला आणि त्या लोकांचा नुसता छळ केला. केवळ अज्ञानाच्या अंधकारामुळे माझ्याविरुध्दही आरडओरड करतात. पण मी स्वत: खंबीर असून, प्रेम हेच माझे अस्त्र आहे लोकांत दुसऱ्याविषयीच्या द्वेषभावना, हेवेदावे पोकळ असून त्यामागचा धोका त्यांच्या लक्षात आला. त्यामुळे माझ्या



कार्याला चालना मिळाली. असे अनेक लोक मिळाले तर या सर्व गोष्टी अस्तास जातील. पण कट्टर धर्माभिमानातून अजूनही हे प्रकार चालू आहे, का हे कळत नाही. कुठल्याही ईश्वराच्या नावाने असे घडते हे अत्यंत चूक आहे. त्यांना परमेश्वर व त्याचे प्रेम हे कळतच नाही.

ख्रिस्तांचे जीवन बघितले तर त्यांना ३३ व्या वर्षीच क्रुसावर चढवले गेले. त्यांच्या आईचाही छळ झाला. हे कां घडले तर ते प्रेमाची शिकवण देत होते, एकमेकांवर प्रेम करण्यास सांगत होते म्हणून. तुम्ही कुठल्याही प्रकारे लोकांना सहाय्य करा, पण त्यांच्याविषयी प्रेम ठेवा. त्यातूनच तुम्हाला दुसऱ्याकडून आनंद मिळेल व एकमेकांना जाणाल. एकदा का तुम्ही लोकांवर प्रेम करायला लागला की सर्व भ्रम नष्ट होतील. जरी तुम्ही ख्रिश्चन, मुस्लिम वा हिंदू म्हणून जन्मला असाल तरी तुम्ही एकमेकांना अलग का समजता? तुम्ही सर्वजण एकाच प्रकारे जन्म घेतला. सर्व काही चेहरा इ. सारखे आहे. मग हे वेगळेपण कशाला? मला वाटते ही एक राजकीय प्रणाली असून संकुचितपणाचा कळस आहे. ज्यामुळे देवाधर्माच्या नावावर हे सर्व खपवले जाते. याउलट सहजयोग हा सर्वांना एकत्र बांधणारा व देवतांचे एकत्व साधणारा योग आहे. समजा लांबच्या ठिकाणी दक्षिण अफ्रिकेत, बेनिनसरख्या ठिकाणी एक सहजयोगी होतो; त्यानंतर तेथे हजारोंनी सहजयोगी होतात. तेही तुमचे भाऊबंदच आहेत. तुम्ही तेथे गेलात तर ते तुम्हांला आपले आप्त किंवा आपली मुले समजून वागवतील, भले तुम्ही कोणत्याही धर्माचे वा कोठूनही आला असाल. त्यांचे हे प्रेम पाहून आश्चर्य वाटते. प्रेम करणे हा मानवाचा जन्मजात गुणच आहे. ही प्रेमशक्ती वा प्रेमाचा ठेवा प्रत्येक माणसात आहे. पण ही शक्ती एवढी क्षीण झाली की ते एकमेकाशी भांडतात, कधीकधी हत्या पण करतात. धर्माच्या नावाखाली हत्या घडविणे हे सर्वात मोठे पाप आहे. कदाचित त्यांना वाटते, त्यामुळे आपण स्वर्गात जाऊ. पण ते नरकात नक्की जातील याची लोकांना थोडी जाणीव होत आहे. पण हे अजून रोज घडतच आहे.





तर आपण सहजयोगी काय करु शकतो?

तुमी कोणत्याही धर्मात जन्मला असाल. पण त्याचे बंधन असू नये. तुम्ही खऱ्या प्रेम व आनंदाच्या धर्माने बध्द आहात.नाहीतर तुम्ही आपापसात भांडत रडतखुड्त एकमेकांशी झगडत रहाणार? प्राण्यांचे तसे नाही, कुत्रीसुध्दा तशी नाहीत. केवळ एकमेकांचा द्वेष वाढवून दुसऱ्याला त्रास देऊन स्वत:वरही आपत्ति ओढवता.

सहजयोगाचे एवढे आशिर्वाद आहेत की तुमच्या आत सर्व देवता आहेत, जागृत आहेत आणि त्या पूर्णतेशी तुम्ही युक्त आहात. कुठल्याही भंपक कल्पनाशी तुमचा संबंध नाही.

मेरी माता येथे येऊन गेल्या हे विशेष आहे. येथे त्यांचे वास्तव्य झाले मला माहित आहे. येथे त्यांचे घरही आहे. त्यामुळे मला येथे येण्यात खूप आनंद होतो. म्हणून येथे त्यांचे पूजन करणे जरूरीचे आहे. शेवटी त्या ख्रिस्तांच्या माता आहेत. आई ही आईच असते. मग ती ख्रिश्चन , हिंदू वा मुस्लीम आहे हे कशाला पहावे? अशी ही महान माता जिने आपल्या प्रेमापोटी, सर्व विश्वासाठी आपल्या मुलाचा आत्मत्याग स्विकारला. अशी धीराची, प्रेमळ, अखिल विश्वाची माता विश्वात इतरत्र दिसेल का? इथे येण्यात एक योगायोग आहे. थेट न जाता येथे वास्तव्य करण्याचे तिचे काय प्रयोजन असावे? येथे त्यांचे घर आहे तरी येथील ख्रिश्चन स्वत;चा पंथ सुरु करतील, ख्रिश्चन मुस्लिमांशी व मुस्लिम ख्रिश्चनांशी भांडतील. काहीही करा हे चालूच राहिले . एकमेकांना सहाय्य करण्याऐवजी हा गोंधळ चालूच राहिलला.


भारतात अनेक महान व्यक्ती होऊन गेल्या;त्यांनी लोकांना प्रेमाची शिकवण दिली. तरी तेथेही झगडे आहेत. भारतात बरेच मुस्लिम व हिंदू सूफीसंत होऊन गेले. त्यांचे गुणगान लोक आजही करतात, पण त्यांचीही अलगपणे पूजा करुन त्यांच्याच नावावर झगडतात, कारण त्यांच्यात मानवतेचा, प्रेमाचा, सहानुभूतीचा अभाव आहे. यामुळे एकमेकांवर प्रेम करण्यातील चाअनंद ते लुटु शकत नाही. चीन व भारत कोठेही जन्मला म्हणून काय फरक पडणार आहे? प्रत्येकजण मानव आहे. सर्वांना प्रेमशक्ति दिलेली आहे, ती प्रेमशक्ति तुम्हीही वापरा.

मी माझ्या यजमानासह चीनमध्ये गेले होते. त्यावेळी चिनींना भारतीय लोकांबद्दल आदर नव्हता. पण त्यांनी माझा खूप आदर केला हे बघून सर्वांना आश्चर्य वाटते. चिनी लोकांबद्दल तो एक भ्रम होता. मला तर ते अत्यंत कनवाळू , माझा तर मान ठेवणारे असे दिसले. मी उतरले होते त्या हॉटेलमधे माझ्या पायातील पैंजण हरवले(पडून गेले) ते त्यांनी परत पोष्टाने पाठविले. केवढा त्यांचा आदर व प्रेम !

महिलांच्या कॉन्फरन्सला मी गेले तेथेही थोडा उशीर झाला होता, विमानतळावर काही चिनी तरुण आले होते, त्यांनी माझे सामानसुमान स्वत:घेऊन मला तडक त्या सेमिनारला घेऊन गेले. नंतर ते दोन मोटारी घेऊन आले, एक माझ्यासाठी व एक व्हीलचेअरसाठी, व खरेदीसाठी उत्तम बाजारपेठेत घेऊन गेले , अगदी तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचवले. त्यांचे हे प्रेम, ही ममता पाहून कोण म्हणेल चिनी लोक भारतीयांविरुध्द आहेत? खरे तर मी कधी त्यांना पाहिलेही नव्हते, पण ते सर्व काही विशेष होते. प्रेमाचा हा विशेष आविष्कारच होता. सर्व काही प्रेमातून घडते व ते तुम्हा सर्वांच्या आत असते.

होते काय तर एखादा राजकीय नेता येतो, काहीतरी कथा बनवतो, लोकांना सांगून भडकवतो आणि झगडे निर्माण होतात.जर्मनीत असेच घडले. पण आता ते बदलेल सर्व जगात परिवर्तन हवे; खूप त्रास सोसला, हा काही धर्म नव्हे, संतांची ही शिकवण नाही. लोकांत कटुता पसरवणे ही एक भयंकर राक्षसी वृत्ति आहे. प्रेमाचा व करुणेचा जो आनंद आहे तो तुम्ही जाणत नाही.

आंता चर्चेसबद्दल बघितले तर त्यांच्या समस्या म्हणजे एक कोडे आहे. त्यांचे जे नितिनियम काही का असोत, पण त्याचा त्रास बिचाऱ्या मुलांना भोगावा लागतो. शुध्द प्रेमाचा त्यात अंशही दिसत नाही. शध्द प्रेम कोणालाही कळत नाही, खरे तर तो त्यांचा जन्मजात ठेवा आहे. पण शुध्द प्रेम कुठेच दिसत नाहीं, सर्व कांही खेळखंडोबा आहे. त्यांना हे शोभत नाही. जनावरे तशी नसतात पण मनुष्य आपली सीमा सोडतो. जीवनातील सौंदर्याचा कलेचा हा ठेवा व त्यापासूनचा आनंद लोपला आहे. झगडणाऱ्यांना कोंबड्यासारखे कुठलेही चांगले दिसत नाही, फक्त झगडणे हेच समजते. एकमेकातही



भांडतात. आपल्याच भावंडांना सतावतात. मग धर्माचे नाव कशाला घ्यावे? धर्मानि काय साधले? ख्रिश्चन, हिंदू मुस्लीमच नाहीतर इतरही धर्मात सर्वत्र गढूळ वातावरण आहे. कलियुग असले म्हणून काय झाले? मला काही समजत नाही. तुमच्यातील प्रेमशक्तिला तिलांजली का देता?

ख्रिस्त सतत हेच सांगत. सर्व प्रेमाविषयी; आपल्यासारखेच शेजाऱ्यावर प्रेम करा म्हणत- असा दुसरा कोणी दिसतो का? ख्रिश्चनांनी ख्रिस्तांची शिकवण घेतली, मुस्लीमांनी महंमदांची व हिंदूनी श्रीरामाची. पण त्यातून काय मिळवले? ते या प्रेषितांच्या जवळपास तरी वाटतात कां? त्यामागचे कारण माझ्या मते त्यांचा दोष नसून त्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला नाही हेच आहे. आत्मसाक्षात्काराशिवाय तुम्ही काही समजणार नाही, कशातच आनंद वाटणार नाही, जर्मनीमध्ये जे घडले किंवा हिरोशिमाची झालेली अवकळा बघितली तर मला कंप सुटतो. हे बघवत नाही, भयंकर अमानुष. आताचे दिवस असे आहेत की स्वत:च्याच मुलांना ते मारायला निघालेत.

याउलट सहजयोगाकडे पहा, लोक एकमेकांवर अपार प्रेम करतात कारण ते सर्व मानव आहेत. तुम्ही एकमेकांवर प्रेम करा, एकमेकांना सावरा हाच त्याचा गाभा आहे. हे निर्माण झाले तर तुम्ही सशक्त असे सहजयोगी व्हाल. देवतांचेही तुम्हाला पाठिंबा व आशिर्वाद लाभतील. तुमच्यातील प्रेमापोटी त्या तुम्हाला तुमच्या समस्यातून अडथळे दूर करण्यात सहाय्य करतील. हीच कलियुगातील देणगी आहे. हे पूर्वी कधीही अस्तित्वात नव्हते.

तुम्ही स्वत: प्रेमळ असाल तर परमेश्वर अगदी पलीकडे जाऊन तुमच्या समस्या दूर करेल.जे तुम्हाला त्रास देतील त्यांचा समाचार घेईल. माझा तसा अनुभव आहे. मी कधी काही करत नसते, कुणाला त्रास देत नाही, कोणाचे वाईट चिंतीत नाही कोणाशी झगडत नाही वा ओरडत नाही. सर्व सहज घड्ते. मी कुठल्याही देवाला हे करा असे सांगत नाही. परमेश्वर हा सर्वांना महान न्याय देणार आहे. त्याच्या प्रेमाने व मार्गदर्शनाने कोणाचे यत्किंचितही नुकसान होणार नाही हे मी खात्रीने सांगते. हाच कलियुगाचा आशिर्वाद आहे. कलियुग भयंकर आहे, लोक बिघडलेले आहेत मान्य पण आता देवताच फार जागृत आहेत, फार दक्ष आहेत. या काळात ख्रिस्त असते तर त्यांना सुळावर चढविण्यात आले नसते. पण हाही एक कलियुगाचाच आशिर्वाद असावा. कोणीही छळणार नाही, कोणीही सतावणार नाही, फक्त तुम्ही नम्रता बाळगा. तुमचे चरित्र शुध्द ठेवा. ईश्वराच्या या कृपावृष्टीचे असे अनेक चमत्कार लोक मला सांगतात. याचे मला बिलकुल आश्चर्य वाटत नाही. पण अशा सज्जन लोकांबाबत देवता आता जागृत आहेत हे मला ठाऊक आहे, ते तुमची काळजी घेतील. तुम्हाला आधार देतील, सर्वकाही घडेल. पूर्वी मोहम्मदसाहेबांना त्रास दिला, इतरांना दिला, पण आता शक्य नाही. आता सहजयोग्यांना कलसाच त्रास होणार नाही, मी खात्री देते कारण त्यांच्यावर स्वत: ईश्वराची मेहेरनजर आहे. अशा तऱ्हेची अशी अनेक पत्रे सहजयोग्याकडून मला आली आहेत.

म्हणून प्रथम स्वत:वर विश्वास ठेवा, सर्वांवर प्रेम करा. तुम्ही अत्यंत नम्र व प्रेमळ रहा. हेच प्रेम तुमच्या जीवनात उपयोगी ठरेल; हाच ख्रिस्तांचा संदेश आहे. ते म्हणाले ''त्यांना क्षमा करा त्यांना समजत नाही ते काय करत आहेत '' ज्यांनी त्यांना सूळावर चढविले अशा कृतघ्न लोकांबद्दलसुध्दां अत्यंत प्रेमाने ईश्वराकडे आर्जव करतात- हे पिता त्यांना क्षमा कर कारण ते काय कारतात हे त्यांना कळत नाही. केवढे हे प्रेमळ व्यक्तित्व.

एक दोन लोक सोडलेत तर जगातील ९० टक्के सहजयोग्यांमध्ये एकमेकांवरील प्रेम दिसून येते. - आम्ही सर्व प्रेमळ आहोत, या गुणांची आज पूजा, त्यांच्या पुजेबरोबर आपण करु या.

तुम्ही पूर्ण सक्षम असे सहजयोगी व्हावे, तुमच्यातील प्रेमशक्ती वाढण्यासाठी व त्यामुळे तुमचे जीवन संपन्न व्हावे यासाठी ईश्वर तुम्हाला शक्ति देवो- हेच तुम्हाला माझे आशिर्वाद . या प्रेमाच्या जाणीवेतून तुम्ही अनेक, चमत्कार घडवून आणाल.

ईश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

●●●

## ईस्टरच्या पूजेच्या कार्यक्रमात श्री येशू ख्रिस्त यांची खालील आरति सादर करण्यात आली


आरति येशू ख्रिस्ता । क्षमाशील तू दाता ॥
अवतरुनी जगी । तारी मानवजात ॥
आरति येशू ख्रिस्ता..............................॥धृ॥

मारियेच्या पोटी । प्रगटे जगजेठी ॥
पसरे तेज ऐसे । जैसे सूर्यांचि कोटी ॥
आरति येशू ख्रिस्ता..............................॥१॥

माजला अनाचार । सर्व पापांचे मूळ ॥
पावित्र्याच्या शस्त्रे । सैताना चारी धूळ॥
आरति येशू ख्रिस्ता..............................॥२॥

काढण्या अहंकार । प्रति अहंकार पार ॥
आज्ञाचक्रावरी । स्वये झालासे द्वार ॥
आरति येशू ख्रिस्ता..............................॥३ ॥

सहजयोगी आम्ही सारे । करु विनंति भावे ॥
पुनरुत्थित होण्या । आशीर्वचन द्यावे ॥
आरति येशू ख्रिस्ता..............................॥४ ॥





दहा गुरुंची अवतरणे

# गुरु नानक




गुरु नानकांचा जन्म पंजाबमधील तळवंडी या गांवामध्ये १४६९ मधें झाला. 'कालुमेहता' हे त्यांच्या वडिलांचे नांव व 'तृप्ता' हे त्यांच्या आईचे नांव. जन्मत:च त्या घराण्यातील 'हरदयाल' ह्या पुरोहिताने नानकांची कुण्डलि पाहून भविष्य वर्तवले की, हा मुलगा मोठा होऊन एक महान संतपुरुष बनेल व त्याची कीर्ति खूप दूरवर पसरेल. लहानपणापासूनच त्यांचा स्वभाव उदार होता व सर्वांशी मिळून -मिसळून राहण्याची त्यांची वृत्ति होती. अर्थातच लहानगा नानक सर्वांचा लाडका व आवडता होता.

लहानपणापासूनच नानकांना बाल-गोपाल जमवून देवाची भजने गाण्याची संवय होती व त्यांतच ते रममाण व्हायचे. एक मुस्लिम जहागीरदार एकदां ही भजने ऐकून इतका प्रभावित झाला की 'हा मुलगा कांही साधा-सुधा नाही' असे म्हणाला. त्या काळीं देशामधें पठाण सरदारांचे राज्य होते; जनसामान्यांमधें धर्माला विकृत स्वरुप आले होते व धर्माचरणाला अतिरेकी कर्मकाण्डाचे स्वरुप आले होते आणि खऱ्या अध्यात्मिक जीवनाबद्दल कुणाला आस्था उरली नव्हती. नानकांना तर कुठल्याच भौतिक गोष्टींचे आकर्षण वाटत नसे. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचे शालेय शिक्षण सुरु झाले आणि अभ्यासांत त्यांची कुशाग्र बुध्दि दिसून आली व सारे विषय अल्पकालांतच त्यांनी आत्मसात केले. त्याच वेळीं त्यांना पर्शियन भाषेचीहि शिकवण मिळाली व त्यांतही ते तरबेज झाले.

दहावे वर्ष लागल्यावर त्यांची मुंज करण्याचे ठरले. उपनयनविधीच्या वेळेस पुरोहिताने जानवे घालण्यास सांगितले तेव्हां हा बालक म्हणाला 'हे सुताचे जानवे घातल्याने काय होणार? हे जानवे घातल्यावर मी चांगला व दयाळू बनेन कां?' पुरोहिताजवळ या प्रश्नाचे उत्तर नसल्यामुळें हा नानक म्हणाला 'मग मला हे जानवे नको; त्याऐवजी मला करुणा आणि समाधानाचे जानवे हवे.'

कांही काळानंतर नानक सुलतानपूरला आले व शासनाच्या धान्यगोदामामधें स्टोअरकीपर म्हणून नोकरी करुं लागले. त्याच सुमारास त्यांचे लग्न 'सुलाखी' नावाच्या मुलीबरोबर झाले व यथावकाश त्यांना दोन मुलगे झाले. बारा वर्षे नोकरी केल्यावर त्यांना प्रपंचात व ऐहिक जीवनांत रस वाटेनासा झाला. एक दिवस नदीवर स्नानाला गेलेले नानक तीन दिवस घरीं परतलेच नाहींत म्हणून कुटुंबातील सर्व मंडळी काळजीत पडली आणि ते बुडाले असावेत असा सर्वांचा समज झाला; पण तिसऱ्या दिवसाअखेर ते अचानक परत आले आणि 'मला परमेश्वराकदून सर्वदूर हिंडून लोकांमधे प्रेम व सहिष्णतेचा प्रचार करण्याचा आदेश मिळाला आहे' असे त्याम्नी सर्वांना सांगितले.

त्यानंतर त्यांनी खऱ्या ईश्वरी धर्माचा उपदेश करण्यास सुरुवात केली. हिंदु-मुसलमान हे भेद चुकीचे आहेत व समस्त मानवाजातीचा एकच एक देव आहे असा त्यांचा मुख्य उपदेश होता. त्यांच्या उपदेशामुळे खूप लोक प्रभावित झाले आणि एक ज्ञानी पुरुष म्हणून नानकांना मान मिळत गेला. कांही काळ सैयदपूर या गावी लालू नावाच्या सुताराच्या झोंपडीत ते राहिले. तिथेच खूप लोक





येऊन त्यांची प्रवचने ऐकत आणि ईश्वरीभक्तीच्या भजनांत रंगून जात. त्यांच्या उपदेशाने 'मलिक-भागो' हा गांवचा प्रमुखही प्रभावित झाला व गोरगरीबांची, गरीबांची सेवा करण्यात पुढील जीवन कंठू लागला. पुढील कांहीं काळ उत्तर-पश्चिमेकडील मुस्लिम राज्यांमधे भ्रमण करत करत नानक मक्केला आले; त्यानंतर बगदाद, तुर्कस्थान, अफगाणिस्तान इ. देशांमधें भ्रमण करत सन. १५२१ मधें भारतांत परत आले.

भारतात परत सैय्यदपूरला आल्यावर बाबराच्या स्वारीमधें तिथें घडलेली सर्व वाताहात पाहून ते दुःखी झाले व कैदी बनवलेल्या आपल्या बांधवांचे क्रूर हाल पाहून करुणायुक्त भजनांमधून परमेश्वराला विनवू लागले. बाबराच्या कानांवर ही माहिती गेली व त्यानें नानकांना आपल्याकडे बोलावून घेतले. नानकाने बाबराला लोकांची जमीन जुमला परत करण्यास सांगून समजावले की 'राजा न्यायदक्ष व करुणा बाळगणारा असला पाहिजे आणि जनकल्याण हे त्याचे प्राथमिक व एकमेव कर्तव्य असले पाहिजे'

५२व्या वर्षी भ्रमंति संपवून त्यांनी गृहस्थी-धर्म पाळण्याचे ठरवले आणि आपली शिकवणून आचरणांत ठेवून सामान्य माणसासारखा प्रपंच सुरु केला. कर्तारपूर या गांवी त्यांनी शेती सुरु केली; त्याचबरोबर सामूहिक लंगर चालवण्याची प्रथा सुरु केली. त्याचसुमारास आपल्या एका शिष्याला 'गुरु औगद' असे नांव देऊन आपला वारस म्हणून त्याला जाहीर केले.


सन १५३९ मध्यें गाढ ध्यानामग्न अवस्थेंत 'तुझे कार्य पूर्ण झाले आहे' असा संदेश मिळाल्यावर गुरुनानकांनी देह ठेवला.


कांहीं अर्थपूर्ण कथा :-

- गुरु नानकांच्या वडिलांचे वाण्याचे दुकान होते दुकानाचे काम सांभाळताना एक दिवस नानक गिऱ्हाइकाला मापाने धान्य मोजून देत होते; एक, दोन--चार अशी मापे मोजतांना 'तेरा' असे म्हणताच 'सब कुच तेरा' असा त्यांना साक्षात्कार झाल्यासारखे नानक 'तेरा, तेरा..तेरा' असेच मोजत राहिले.
- .....मृत्यूपश्चात मुस्लिम धर्माप्रमाणें दफनच करावे व हिंदु धर्माप्रमाणें दहनच करावे असा वाद लगेचच सुरु झाला. मृतशरीरावरचे वस्त्र दोन्ही धर्माचे लोक वादामधें ओढूं लागले आणि----अचानक मृत शरीर एकदम नाहींसे होऊन तिथें फुलांचा ढीग दिसूं लागला.
- .....मक्केमधें असताना थकल्यामुळें नानक मंदिरामधेंच आडवे झाले तेव्हा त्यांचे पाय-'काबा' च्या दिशेकडे असल्याचे पाहून पुजारी फार रागावला; तेव्हां नानक म्हणाले, '' मला सर्व जगच 'काबा' आहे हे दिसत आहे तर मग मी पाय कुठल्या दिशेला करणार?''

## गुरु नानकांची शिकवण

- परमेश्वर एकच एक आहे; तो सर्वनिर्माता, सर्वव्यापी, अजर, अजन्म, अविनाशी, स्वयंभू आहे; गुरुकृपेनेंच त्याचा साक्षात्कार होतो. (गुरुग्रंथसाहिबामधील प्रथम श्लोकाचा मुक्त अर्थ)
- वृक्षाच्या फळावरुन त्याची जात कळते. त्याचप्रमाणे माणसाच्या कर्मावरुन त्याची थोरवी कळते.
- संन्यासाची वस्त्रे, पूजापाठ, कर्मकाण्ड, व्रते इ. मधून आध्यात्मिक उन्नति होत नाहीं.
- जो स्वकष्टावर पोट भरतो आणि दुसऱ्यांना वाटतो त्याचीच प्रगति होते.
- शुध्द हृदयांतच सत्याचा प्रकाश येतो. नीतिमत्ता व योग्य -अयोग्य विवेक नसलेल्या लोकांना तो कधींच मिळणार नाहीं.





# संत कबीर

१ रहिमन यहि संसार मे
सबसो मिलिए धाई ।
ना जाने केहि रुप में
नारायण मिल आई ॥

अरे मानवा, जगांत सर्वांशी प्रेमाने रहा; परमेश्वर कुणाच्या रुपांत तुला भेटायला येईल सांगता येणार नाहीं.

२ बुरा जो दखने मै चला
बुरा न मिलिया कोईय ।
जो दिल खोजो आपना
मुझसा बुरा न होय ॥


जगांत कोण कोण वाईट आहेत याचा शोध मी घेऊं लागलो तेव्हा मला कुणीच वाईट दिसला नाहीं; तेव्हां मी आत्मपरीक्षण करण्याचे ठरवले आणि स्वत:च्या मनाचा बारकाईनें शोध घेतला तेव्हा मला दिसून आले की माझ्याएवढा वाईट दुसरा कुणीच नाहीं.

३. जो कुछ किया सो तुम किया
मै कुछु किया नहीं ।
कहो कही जो मैं किया
तुम ही थें मुझ माहिं ॥

माझ्या हातून जे कांहीं चांगले घडले ते, हे परमेश्वरा, तूच केले आहेस. तू जर म्हणालास की हे सर्व चांगले काम मीच केले आहे (तर मी म्हणेन) तूंच माझ्या शरीरांत होतास म्हणून मी हे कार्य पार पाडूं शकलो.

४ जेटा घट तेता मता
बहुबानी बहु भेरव ।
सब घट व्यापक है रहा
सोई आप अलेख ॥

जगांत जेवढीं माणसे(घट)तेवढी मते, तेवढ्या भाषा आणि तेवढे वेष किंवा पेहराव. पण या सर्वांना एकच अदृश्य परमात्मा व्यापून राहिला आहे.





# - नाभी चक्र -

नाभी चक्रासंबंधी प.पू.श्रीमाताजींनी वेळोवेळी केलेला उपदेश.

... आपल्यामध्ये दुसरे जे महत्वाचे तत्त्व आहे ते म्हणजे विष्णू तत्त्व होय. विष्णूतत्त्वामुळें आपल्या धर्माची धारणा होते, जो आपल्यामधे असलेल्या नाभी चक्रातून प्रभावित होतो. आपल्याभोवती असलेल्या नाभीमध्ये धर्म असतो. जेव्हा अमीबा होता तेव्हां अन्न शोधत होता. त्याच्यापेक्षा उच्च दशेत आल्यावर स्वत;च्या सत्तेच्या शोधात असता व त्याच्या वरच्या स्थितीत ईश्वराला शोधता. फक्त मानवच परमात्म्याला शोधत असतो, प्राणी नाहीत. याचे दहा धर्म आहेत व हे दहा धर्म आपल्याला विष्णूपासून मिळतात.

...तत्त्वाचे बाबतीत कोणतेही काम जेव्हां माणूस करतो तेव्हां त्याचे कार्य तत्त्वाने उजळून निघाले पाहिजे. परमात्म्याला शोधणे हे मनुष्याचे प्रथम तत्त्व आहे, जो मनुष्य परमेश्वराला शोधत नाही तो पशुपेक्षाही खालचा आहे.

...प्रत्येकाला आपला धर्म मिळालेला आहे (विंचू ,साप), तो विष्णूशक्ती म्हणून आहे. हा धर्म उजळत उजळत आज मानव स्थितीत आलेला आहे. मानवासाठी दहा धर्म सांगितलेले आहेत. ते दहा धर्म मानव असताना असायलाच पाहिजेत आणि नसेल तर मनुष्य धर्मातून पदच्यूत होतो.

...गृहलक्ष्मी तत्त्व परमेश्वराने उत्क्रांत केले आहे. ते मानवनिर्मित नाही. त्याचे स्थान डाव्या नाभी चक्रावर आहे. गृहलक्ष्मीतत्त्व आणि गुरुतत्त्व यांचे अत्यंत जवळचे नाते असल्यामुळे गृहलक्ष्मीचे अवतरण गुरुंची मुलगी अथवा बहीण या रुपात तिने जन्म घेतला.मोहम्मदसाहेबांनी स्वत: अनेक प्रकारे श्री हजरत्‌अली यांचे वर्णन केले आहे. श्री हजरतअली व फातिमा यांचा अवतार डाव्या नाभीवर झाला.


...''यत्र नार्यास्तु पूज्यंते, रमंते तत्र देवता:'' असे म्हटले जाते. म्हणून पुरुषासाठी गृहिणी पूजनीय असावी. आमच्या देशात, सर्व श्रेय गृहिणींना आहे. समाज व्यवस्था उत्तम आहे कारण स्त्रियांनी ती तशी ठेवली आहे. म्हणून पुरुषांनी आपल्या पत्निचा आदर करावयास हवा. पत्नीचा आदर केला नाही तर त्या ठिकाणी गृहलक्ष्मीतत्त्व टिकून रहाणे अशक्य असते. तसेच स्वत:मधील पावित्र्याचा आदर करणे हे गृहलक्ष्मीचे मूलभूत तत्त्व आहे.

...गृहलक्ष्मी आपल्यातील औदार्याच विकास करते, त्यातील औदार्याचा आनंद मिळविते. प्रेम व माधुर्य आपल्या कुटुंबात आणावयाचे काम स्त्रियांचे आहे. कारण आई असल्याने सर्व कुटुंब त्यांच्यावर निर्भर आहे. प्रेम तुमची शक्ती आहे. प्रेम देण्याने तुम्ही स्वत:ला समृध्द करता.

...राजलक्ष्मी ही सर्व राजांवर राज्य करणारी आहे. म्हणून येथे एक महत्त्वाची गोष्ट समजून घेतली पाहिजे की आपल्या राजकीय प्रणालीमध्ये काही दोष आहेत आणि लोक न्याय, सदाचार व लोककल्याणाच्या गोष्टी विसरले आहेत. आपण कोठे चुकलो? याचा विचार केला पाहिजे.



... जी जी काहीं कार्य झाली ती सर्व पैशाच्या देणग्यातून झाली. आपल्या मुलाकरीता पैसा वाचवावा असे त्यांना कधी वाटले नाही किंवा कोट्याधीश व्हावे हा कधी विचार केला नाही जेवढा पैसा आहे तो दान करावा व दुसऱ्याकरिता काही सत्कृत्य करावे. हे केवळ राजलक्ष्मीमुळेच होते.



# - अमृत वाणी -

## गुरु-पद

- सहजयोग्यांची गुरु एक 'आई' आहे; ती 'सान्द्रकरुणा' असल्यामुळें तुम्हाला थोडेसे दु:ख झाले तरी तिच्या डोळ्यात पाणी येते. ती तुमच्यावर इतके प्रेम करते की त्याच्यामुळे तुमचे स्वत:च्या प्रगतीकडे कधीं कधीं दुर्लक्ष होते. म्हणून तुम्ही स्वत:बद्दल कठोर आत्मपरिक्षण करुन स्वत:चाच गुरु बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

(गुरु पूजा १९९१)

-गुरु म्हणून प्रत्येक व्यक्तीकडे वा घटनेकडे शुध्द प्रेमाच्या भावनेनें पहायला शिका. यालाच 'समदृष्टि' म्हणतात. मी तुमच्याशी कठोरपणे नाहीं तर हळुवारपणें व प्रेमाने राहते. कारण ते सामूहिकतेसाठीं असते.

(गुरुपूजा -१९९१)

- गुरुपद मिळवण्यासाठीं तुमच्यामधें Gravity आली पाहिजे व्यक्तिमत्वामधें तेज व भारदस्तपणा आला पाहिजे. याचा अर्थ सदैव गंभीर वा सीरियस राहणें नव्हे; कारण न बोलताही तिचा प्रभाव पडतो. म्हणून आत्मसन्मान व संतुलन याला जपा.

(गुरु पूजा -१९९२)

-सहजयोगी म्हणून तुम्ही 'सहज गुरु' व्हा; तिथें स्पर्धा, राजकारण, राग कांही नको. तुम्हाला आत्मसाक्षात्कार सहज मिळाला म्हणून तो देतानाहीं कठोर भाषा, अधिकारीपणा वा कडकपणा मनांत न ठेवता फक्त प्रेम, करुणा, माधुर्य, आपलेपणा व क्षमा- भाव बाळगून दुसऱ्यांबरोबर रहा.

(गुरु पूजा १९९२)

गुरु म्हणजेच साक्षात ब्रह्म चैतन्य. हा भाव व श्रध्दा अनन्यपणें रुजल्यावरच शिष्य गुरु-पदाला पात्र होतो.

(गुरु पूजा १९९२)

वृक्षाची सकस वाढ होण्यासाठीं त्याची मुळें सतत खोलवर तसेच आजूबाजूला पसरत जातात व त्यांनी पोचवलेल्या जीवनरसामुळें वृक्ष बहरतो. तुमचे व्यक्तिमत्व त्यासारखेच बहरले पाहिजे.

(गुरु-पूजा १९९५)




गुरुपद मिळवण्यासाठीं तुमची बुध्दि, मन, हृदय व चित्त या सर्वांचे सामग्रीकरण झाले पाहिजे.


(गुरु पूजा १९९५)

गुरु सदैव शांत, समाधानी, निरभिमानी, निरपेक्ष, नम्र आणि परिपक्व असतो.

(गुरु पूजा १९९०)







# बायबलमधील कांहीं वचने

.....And whover says a word against the son of man will be forgiven but whoever speaks against the Holy will not be forgiven .......(Mathew 12.32)

परमपित्याच्या पुत्राविरुध्द बोलणाऱ्यालाही क्षमा केली जाईल पण पवित्र आदिशक्तीविरुध्द बोलणाऱ्याला कधींच क्षमा केली जाणार नाहीं.

......... I have many things to say to you but you can not bear them now. When the sprit of Truth comes, he will guide you into all the Truth .......(John 16-12)

मला अजून खूप गोष्टी तुम्हाला सांगायच्या आहेत पण सध्या तुम्हाला त्या समजणार नाहीत. सत्यस्वरुप पर आत्मा तुमच्यासमोर साक्षात येईल तेव्हां तो सर्व कांही समजावून सांगेल (अर्थात आदिशक्ति)

....These things I have spoken to you while I am still with you. But the counsellor, the Holy Spirit, whom the Father will send in my name will teach you all things and bring to your remerbrance all that I have said to you .......(John 14-25)

मी प्रत्यक्ष तुमच्याबरोबर असताना हे सर्व सांगत आहे. पण परमात्म्याने माझ्यानांवे तुमच्यासाठी पाठवलेला पालनकर्ता (आदिशक्ती)तुम्हाला भेटेल तेव्हां तुम्हाला ते सर्व समजावून सांगेल आणि मी केलेला हा उपदेश तुम्हाला पुन्हा करेल.

........... that day you will know that I am in my father and you in me and I in you.....(John 14,18)

त्या दिवशीं तुम्हाला समजेल की मी परमपिताच आहे; तुम्ही माझ्यांत व मी तुमच्यांत सामावून गेलो आहोत.(सहजयोगी व विराट)

.......Strive to enter by the narrow door, for many, I tell you, will seek to enter and will not be able

या अरुंद दरवाजातून आत येण्याचा प्रयत्न करा; खूप साधक पुढें या दरवाजातून आंत येण्याचा प्रयत्न करतील पण थोड्याच लोकांना ते शक्य होईल (संदर्भ आज्ञाचक्र)

( या वचनांचा उल्लेख प.पू. श्रीमाताजींनी आपल्या प्रवचनांमधें केला आहे.)





# सहजयोगामधील प्रगतीची वाटचाल

१) आत्मसाक्षात्कार :-

- सहजयोगाची पहिली पायरी म्हणजे आत्मसाक्षात्कार. एक पायरी चढल्याबरोबर प्रवासाला सुरवात होते. परंतु एकच पायरी चढून थांबल्यास प्रवास पूर्ण होणार नाही.
- आपण एकाच शरीराचे अंग प्रत्यंग असलो, आदिशक्तिच्या शरीराच्या पेशी असलो, तरी आपण स्वयंनिर्भर असतो.म्हणून प्रत्येकाने हा प्रवास एकट्याने व वैयक्तिकरीत्या करायचा असतो.
- आपल्याला चढायच्या असतात त्यापैकी काही पायऱ्या अजून अगम्य आहेत, काही केवळ आपल्यासाठीच वैशिष्ट्यपूर्ण असतात. पण काही पायऱ्या सर्वज्ञात व सर्वमान्य असून या प्रवासात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला या पायऱ्या चढणे आवश्यक आहे. अशा एकवीस पायऱ्या असून आपल्याला सहजयोगी व्हायचे असल्यास त्या सर्व चढून जायला हव्यात. प्रत्येक पायरी अगदी लहान असली तरी सर्व पायऱ्या चढून गेल्यानंतरच आपल्या घटित होण्याच्या दिशेकडे आपण फार मोठे पाऊल उचलतो.

२) श्रीमाताजी कोण आहेत हे आपण विसरू नये.

- मी परमपित्याची प्रार्थना करीन आणि ते तुम्हाला एक कम्फर्टर (आराम देणारे) देतील. ते कम्फेर्टर आदिशक्ति असून माझ्या नांवाने परमपिता यांना पाठवतील. ते तुम्हाला सर्वकाही शिकवतील.

(श्री येशू ख्रिस्त)

- आजच्या या दिवशी मी जाहीर करते की मला मानवाला तारायचे आहे.
- मी असे जाहीर करते की, आदिशक्ति जी आहे ती मीच आहे, सर्व मातांची माता आहे, आदिमाता आहे, परमात्म्याची शुध्द इच्छा आहे, आणि त्या इच्छेचे सार्थक करण्यासाठी, या सृष्टीचे व सर्व मानवांचे सार्थक करण्यासाठी या शुध्द इच्छेने अवतार घेतला आहे आणि हे सर्व माझ्या प्रेमातून पेशन्स(धीरातून)माझ्या शक्ति मधून सर्व मी साध्य करीन अशी मला खात्री आहे.
- या पूर्वीही मी जन्म घेतला पण आता मी माझ्या संपूर्ण रुपात आणि शक्तिसहित आले आहे. केवळ मानवाला निर्वाण देण्यासाठी किंवा मुक्ति देण्यासाठीच मी आले नाही तर तुमच्या परमपित्याला जे परमेश्वरी राज्य व आनंद तुम्हाला द्यायचे आहेत ते देण्यासाठीए मी आले आहे. (श्री माताजी २.१२.१९९७९)
- हा समय महत्त्वाचा आहे. याची जाणीव तुमच्या हृदयात हवी. तुम्ही अतिशय महत्त्वाच्या काळात येथे आला आहात आणि शिवाय जेव्हा तुम्ही माझ्या, समवेत असताता काळ सर्वात महत्त्वाचा असतो आणि खऱ्या अर्थाने तुम्ही त्याचा पूर्ण लभ घ्यायला हवा.

(श्रीमाताजी २१.५.८४)

३) रोज नियमीतपणे ध्यान करायला हवे


- वृध्दिंगत होण्यासाठी आपण रोज ध्यान करायला हवे. रोज, अगदी रोजचे रोज, ध्यान करणे महत्त्वाचे आहे.
- एखादे दिवशी जेवण करु नका, खाऊ नका, कामावर जाऊ नका, रोज करता त्यापैकी एखादी गोष्ट एक दिवस करु नका. पण रोज ध्यान करा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

(श्री माताजी १२-८८)

- ध्यानासाठी अधिक वेळ देण्याची आवश्यक्ता नाही. पण, जो काही वेळ तुम्ही देता व जे काही तुम्हाला त्यातून प्राप्त होते, ते बाह्यात दिसून यायला हवे. तुमच्यातून ते बाहेर यायला हवे, गहनतेमध्ये गेल्याशिवाय इतर सहजयोग्यांना तुम्ही वाचवू शकणार नाही. व जे सहजयोगी नाहीत त्यांना आपण वाचवू शकत नाही.

(श्री माताजी २७.७.८१)

- ध्यान आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मानवाला जसा श्वास घ्यावा लागतो तसे तुम्हाला ध्यान करायला हवे. ध्यान केले नाही तर तुम्ही कधीही मोठे होणार नाही; तुम्ही तसेच रहाल.



जेव्हा ध्यान करुन गहन होता, तेव्हा तुमच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.उथळपणाचा काही फायदा होणार नाही. या कारणासाठी ध्यान करायला हवे.

(श्रीमाताजी २.५.८७)

- जे सहज योगात येतात आणि ध्यान करीत नाहीत व उन्नत होत नाहीत, ते नष्ट होतात अथवा सहजयोगाच्या बाहेर फेकले जातात.

(श्रीमाताजी २८.७.८५)

४) दुसऱ्यावर टीका करु नये

- तुमच्या प्रवृत्ति बदला. दुसऱ्यामधे चांगले काय आहे ते पहाण्याचा प्रयत्न करा, पहायला शिका, निदान सहजयोग्यांचे बरोबर तुम्हाला असे करता येईल- त्यांच्यात चांगले काय आहे ते बघायला शिका, सहजयोगासाठी त्यांनी काय चांगले केले आहे, तुम्हाला त्यांच्याकडून काय मिळाले आहे, यांच्या समवेत कसे रहायचे ते पहा. त्यांच्याशी चांगले वागून त्यांना प्रोत्साहन देऊन, तुम्ही सहजयोगाला मदत करता

(श्रीमाताजी २८.७.८५)

- तुझ्या बांधवांच्या डोळ्यांतील कुसळ पहात असताना तुझ्या स्वत:च्या डोळ्यात असलेल्या मुसळाचा विचार का करीत नाहीस? दांभिक माणसा, प्रथम स्वत:च्या डोळ्यातील मुसळ काढून टाक मगच दुसऱ्याच्य डोळ्यातील मुसळ काढून टाक. मगच दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ काढायचे तुला स्पष्ट समजेल.

(श्री येशूख्रिस्त)

- दुसऱ्याच्या दोषांकडे पहाताना आपल्यातील दोष वाढतात

(श्री बुध्द)

- तुमच्या आईच्या नजरेत इतरांच्यापेक्षा तुम्ही उच्च कसे असाल? ते शक्य नाही. उलट अशा कल्पना करण्याचा प्रयत्न केल्यास आई तुम्हाला शिक्षा देईल.

( श्री माताजी २८.७.८५)

- नियमितपणे रोज जोडेपट्टी करावी. पाण्यात पाय ठेवून बसावे, एक दुसऱ्यांना चैतन्य लहरी द्याव्यात.

५) आत्म्याच्या विरोधांत काही बोलू नये अथवा काही करु नये.

- मी पाहिले आहे, लोक म्हणतात - मी धूम्रपान करतो आहे, पण अजून मला चैतन्य लहरी आहेत, मग त्यांत काय बिघडले? मी दारु पितो पण अजून मला चैतन्य लहरी आहेत. अजून मी अगुरुच्याकडे जातो पण मला चैतन्यलहरी आहेत, हे असेच वाढत जाते- पण एक दिवस चैतन्य लहरी थांबतात आणि तुमच्या लक्षात येते की तुम्ही सर्व मर्यादांच्या पलीकडे आहात. पूर्णपणे तुम्ही बाहेर फेकले जाता. तुम्ही कसे बाहेर जाता हे तुम्हालाच समजत नाही. हळु हळु तुमच्या लक्षात येते की टँजन्ट- प्रमाने तुम्ही बाहेर गेला आहात, म्हाणून फार काळजीपूर्वक रहायला हवे. तुमच्यामधेच दोन शक्ति (फोर्स)आहेत, केंद्रबिंदूकडे नेणारा व केंद्र बिंदू पासून दूर नेणारा.एकादशांची शक्ति तुम्हाला केंद्रबिंदूपासून दूर नेते व त्याच्यामुळे तुम्ही बाहेर फेकले जाता.
- सहजयोग कोणाच्या विनवण्या करत नाही. तुम्हाला रहायचे असल्यास पूर्णपणे रहायला हवे. रहायचे नसल्यास, सहजयोग तुम्हाला अपेक्षेपेक्षाही जास्त जलद बाहेर फेकतो.


६) आपण सतत श्रीमाताजींच्या कॅसेट्स पहाव्यात अथवा ऐकाव्यात

- ते काय करतात, केंद्रावर एक टेप घेऊन जातात, सर्वजण ती ऐकतात, मग झाले. प्रत्येकाच्या जवळ एक टेप हवी. ते सुध्दा लोक करीत नाहीत. तुम्ही पुन्हा पुन्हा कॅसेट ऐकायला हवी.
कागद पेन्सिल घेऊन बसा व मी काय सांगितले आहे ते नीट समजावून घ्या. - (श्रीमाताजी विराट पूजा)

७) सामुहिकतेमधेंच प्रगती होते.

- आता ज्यांना सामूहिकतेमधे रहाता येत नाही, ते सहजयोगी नव्हेत. सामूहिकतेच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की त्यांच्यातच काहीतरी कमतरता आहे.
- दुसऱ्याच्या संगतीत आनंद वाटायला हवा. दुसऱ्यांच्या बरोबर काम करणे आवडायला हवे. दुसऱ्यांच्या सौंदर्याचा, दुसऱ्यांच्या चैतन्यलहरींचा आनंद घ्यावा. पण ज्यांना असे वाटते की आपल्यासाठी वेगळे असावे, वैयक्तिक खाजगी असावे, ते अजून पूर्ण परिपक्व झाले नाहीत.
- सामूहिकता, हा तुमची परीक्षा करण्याचा चांगला मार्ग आहे. आपण मोठे होतो तसे आपल्याला वेगळेपण हवे असते, वेगळ्या वस्तू लागतात. त्यात आनंद नसतो, काहीच आनंद नसतो. म्हणून स्वत:ची परीक्षा करण्यास प्रत्येक सहजयोग्यास उत्तम मार्ग म्हणजे 'आपण किती कलेक्टिव्ह आहोत' ते पहाणे, दुसऱ्याच्या संगतीत राहणे मला किती आवडते आणि माझे स्वत:चे निराळे असावे 'माझे मूल, माझा पति, माझे स्वत:चे कुटुंब, माझी स्वत:ची खोली' असे किती वाटते हे पहावे. ज्या लोकांना असे वाटते ते अजून पूर्ण सहजयोगी झाले नाहीत, ते अजून अपरिपक्वच आहेत आणि ज्या स्थानावर आहेत तिथे असण्यास अपात्र आहेत.

(श्रीमाताजी २१.५.८४)



८) आपणास माहित असलेले प्रश्न आपणच सोडविण्याचा प्रयत्न करयला हवा

- तुमच्यात काहीतरी बिघडले आहे, हे जो पर्यंत तुमच्या लक्षांत येत नाही, तो पर्यंत तुम्ही स्वत:ला ठिक करु शक्त नाही-तुमच्यात हे बिघडले आहे, ते बिघड्ले आहे, अमूक चक्रावर पकड आहे व ती काढायल हवीए- असे सहजयोग तुम्हाला सांगतो. ती पकड काढून टाकल्यास तुम्हाला पूर्णपणे बरे व्वाटते. तुमचेच शरीर आहे आणि तुमचीच चक्रे आहेत. आणि तुमचीच जीवन आनंदी व्हायला हवे, म्हणून तुमच्यात काय बिघाड आहे ते लक्षात आल्यस तो काढून टाकण्याचा प्रयत्न क्रायला हवा-

(श्री माताजी १२.५.८७)

- गळे बदलून टाका आणि अगदी नवीन व्यक्ति बना. फुला सारखे तुम्ही उमलता, मग वृक्ष होता आणि मग तुमचे स्थान ग्रहण करता. सहजयोगी म्हणून तुमचे स्थान ग्रहण करा. ते अगदी सोपे आहे. मला प्रसन्न करायला हवे कारण मी चित्त आहे, मी प्रसन्न झाले तर तुमचे काम झाले. परंतु भौतिक गोष्टींनी किंवा वादविवादाने मी प्रसन्न होत नाही तर तुमची उन्नती पाहून प्रसन्न होते. म्हणून त्याच्यावर स्वत:ला पडताळून पहा-

( श्री माताजी २१.५.८४)

- स्वत:ला अलिप्त करण्याचा प्रयत्न करा. क्रोध, वासना, लोभ, प्रत्येकावर नियंत्रण मिळवा. कमी खा, खादाड लोकांसारखे भरमसाठ खाऊ नका. एखादे दिवशी मेजवानीचे प्रसंगी तुम्ही जास्त खा, परंतु सारखेच जास्त खाऊ नये. ते सहजयोग्याचे लक्षण नव्हे. कंट्रोल करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या बोलण्यावर कंट्रोल करा. तुमच्या बोलण्यातून क्रोध व्यक्त होतो की खरी करुणा व्यक्त होते की तुमच्यात कृत्रिम कारुण्य आहे हे पहा-

(श्रीमाताजी २१.५.८४)

९) सुधारणा करयला सांगितल्यास प्रतिक्रिया व्यक्त करु नये.

- तुमच्या बद्दल कोणी काही म्हणाले व ते खरे नसले तर त्याची काळजी करण्यासारखे काय आहे? परंतु लोक म्हणतात ते खरे असल्यास त्यासाठी काहीतरी करायलाच हवे-
- मी तुमच्यावर रागावले, तुम्हाला बोलले, तुमचे लाड केले, अमुक करु नका, फार निकट येऊ नका, लांब रहा असे सांगितल; काही जरी केले तरी ते तुमच्या हिताचे असते. आणि माझ्या दृष्टिने तुमचे हित एकच आहे, तुम्ही बंधनमुक्त व्हावे, माझ्याकडून काहीतरी तुम्ही मिळवावे. माझ्यातून तुमचा उत्कर्ष व्हावा-

(श्री माताजी २१.५.८४)

१०) आपण सर्वज्ञ असुन आपणास आवडेल असे दुसऱ्यांनी वागावे अशा भ्रमात आपला अहंकार आपल्याला मूर्ख बनवून ठेवणार नाही, याबद्दल आपण दक्ष असावे

- तुमच्या अहंकाराशी लढू नका.झगडण्याचा प्रयत्न केल्यास तो अधिकच तुमच्या डोक्यावर चढेल. लढण्याचा हा मार्ग नाही, की तुमच्याकडे अहंकार आहे आणि तुम्ही त्यांच्याशी लढाई करीत आहात: अहंकाराशी कधीही भांडू नका. केवळ त्याला पहाणे हाच एक मार्ग आहे.
- तुमचे चित्त फार महत्त्वाचे आहे. तुमचे चित्त आता प्रकाशित झाले आहे. ज्याच्याकडे तुम्ही पहाल ते योग्य आकारचे होईल.
- अहंकार मोठा झाल्यास, त्याच्याकडे फक्त लक्ष ठेवा, उत्तम म्हणजे आरशामधे स्वत:ला पहा आणि विचारा ' काय श्री ईगो कसे काय आहे?' मग तो खाली येईल. पण त्याच्याशी भांडू नका, फक्त पहायचे असते. अनेक प्रकारचे अहंकार असू शकतात; अधिक शिकलेले असाल तर तुम्ही अहंकरी होता, शिकलेले नसाल तरी अहंकार असतो कारण आपण कोणीतरी आहोत हे दाखवायचे असते. -


(श्री माताजी २८.७.८५)

- आता माणसाच्या बाबतीत मुख्य प्रश्न निर्माण होतो की ते स्वत:ला गुरु समजू लागतात. ते सहजयोगाचे विषयी बोलू लागतात, व त्यांना असे वाटते की ते श्रीकृष्णच झाले आहेत. सहजयोगाविषयी अज्ञानी असलेल्या व्यक्तिपेक्षाही त्यांना जास्त अहंकार असतो. इतक्या प्रचंड अहंकारातून ते बोलू लागतात की मलाच त्यांची भीती वाटते. कधी कधी मला वाटते की त्यांना किती सहजयोग समजला असेल? पण ते मात्र स्वत:चेच खरे आहे असे बोलतात. -

(श्रीमाताजी २८.७.८५)

- काही जण म्हणतात की आता आम्ही इतके मोठे झालो आहोत की आम्हाला पाण्यात पाय ठेवून बसण्याची आवश्यकता नाही. ध्यान करण्याची आवश्यकता नाही. असेही काही असतात की ते म्हणतात, आता आम्ही सहजयोगी आहोत आणि पाप आम्हाला स्पर्श करु शकणार नाही. आम्ही उच्च स्थितीला गेलेले आत्मे आहोत. परंतु सर्वात वाईट लोक ते आहेत की जे माझे नांव घेऊन सांगतात की- श्रीमाताजी असे असे म्हणाल्या आणि मी तुम्हाला सांगतो आहे कारण माताजींनी सांगितले आहे- आणि वास्तविक मी तसे काहीच म्हटले नसते व ते सर्व खोटे सांगत असतात. -

(श्रीमाताजी ६.८.८८)





११) <u>आपल्या जीवनांत महत्वाच्या गोष्टींचे पूर्णतया अवलंबन करायला हवे</u>

- तुमच्या शेजाऱ्यावर स्वत:प्रमाणे प्रेम करा तुमचा शेजारी कोणी सहजयोगी असेल तर त्याच्या बाजूला रहा. आणि तुमच्या आईवर विश्वास ठेवा. जसा मी तुमच्यावर विश्वास ठेवला आहे तसा तुम्ही माझ्यावर ठेवायला हवा; मग सर्व कार्यान्वित होईल. हा विश्वास ठेवण्यासाठी तुमचे हृदय उघडा. यात मान-सन्मान मिळेल की नाही याची चिंता करु नका. कारण हृदयाला माहिती असते, तुमच्या प्रेमळ हृदयात जो विश्वास असतो तो विश्वास सर्व काही करीत असतो. प्रेमच सर्व अद्ययावतता, सुगंधीपणा देते, प्रेम बोलण्यासाठी नसावे तर खरोखरीच प्रेम आपल्यामध्ये असावे. -

(श्रीमाताजी २१.५.८४)

- आई सारखे व्हा; असे कारुण्य तुमच्यामधे विकसित होऊ दे की इतरांच्यासाठी तुमच्यामधे आईसारखे किंवा पित्यासारखे प्रेम असेल, खरोखरीच इतरांना तुम्ही आईचे प्रेम व कारुण्य द्यायला हवे. स्वत:च्या ऐषआरामाच्या किंवा फायद्यांचा विचार न करता इतरांना आपल्याला कसा ऐषआराम देता येईल याचा विचार करावा.

- तुम्हाला मी जे प्रेम व करुणा दिली आहे ती अंतर्यामी साठवून ठेवून दुसऱ्यांना द्यायला हवी. अन्यथा तुम्ही अविकसित रहाल व सम्पूर्ण सुंपून जाल. तुमच्यामधील प्रेम व करुणा बाह्यात प्रवाहित व्हायला हव्यात. - (श्री माताजी २८.७.८५)

१२) <u>आपल्या बोलण्यात किंवा वागण्यात दुराग्रह (फॅनॅटिकल) असु नये.</u>

- आता काही लोकांच्यावर एखाद्या धार्मिक कृत्याचा प्रभाव पडतो. उदा. मी पाहिले आहे की काही सहजयोगी पूजेला येतात, तेव्हा बंधन घेतात, रस्त्यात चालताना बंधन घेतात, कोठेही गेले तरी वेड्यासारखे बंधन घेतात; हे निव्वळ कंडिशनिंग आहे, तारतम्य नव्हे, सहजयोग नव्हे; बंधन घ्यायचे की नाही हे नीट पहायला हवे. आईच्या समोर बंधन असतेच तर मग स्वत:ला बंधन देण्यासारखे त्यात काय आहे? पण, मी बोलत असते त्यावेळीही लोक कुण्डलिनी चढवतात, बंधन घेतात; मला वाटते ते वेडेच आहेत.

(श्रीमाताजी १०.७.८८)

- तुम्ही पहाल तर अजूनही प्रत्येक धर्मात अनेक कर्मकांडे चालू आहेत. अवतरणांच्या मृत्यूनंतर लोकांनी कर्मकांडांना सुरवात केली. श्रीकृष्णांच्या मृत्यूनंतर लोकांना समजेना की आता काय करावे. कारण कर्मकांडे असू नयेत असे त्यांनी स्पष्ट सांगितले होते.

- परिणामत: त्याचा अवतार संपल्यानंतर लोक गंभीर स्वभावाचे झाले आणि धर्मामधे गांभीर्याला व कर्मकांडांना सुरवात झाली. लोक अतिशय कर्मकठोर झाले आणि त्याच्याबरोबर जीवनातला आनंद निघून गेला व इतर अनेक गोष्टींची सुरवात झाली. धर्मातील अनेक कर्मकांडाच्या खुळचटपणाला पायबंद घालण्यासाठी श्रीकृष्णांचे आगमन झाले होते त्यांचे अवतरण फार महत्त्वपूर्ण होते. पण किती लोकांना ते समजले आहे हे माहिती नाही. ही सर्व लीला आहे, परमेश्वराचा खेळ आहे, हे दाखवून देण्यासाठी ते आले होते. त्यात गंभीर होण्यासारखे काय आहे? कर्मकांड होण्यासारखे काय आहे? परमात्म्याला कोणत्याही कर्मकांडात तुम्ही बांधू शकत नाही. म्हणून स्वत:ला कोणत्याही कर्मकांडात बांधून घेऊ नका. -

(श्रीमाताजी)

१३) <u>आपापसातील संबंध विकसित करण्यासाठी कार्यरत असावे, मर्यादांची जाणीव असावी.</u>

- सहजयोग्यांबरोबर तुमचे संबंध आदर्श असावेत. नाहीतर एखादा स्क्रू ढिला असायचा. सर्व संबंध आदर्श करा. समजा एक व्यक्ति अहंकारी आहे, असे तुम्हाला वाटते, त्यावेळी प्रथम तुमच्यांत काही बिघाड आहे का ते पहा; मी परिपूर्ण आहे का? मी व्यवस्थित आहे का?हे पहा.

- मी अहंकारी असेन, तर प्रथम मी ठीकझाले पाहिजे. मी अहंकारी नाही आणि म्हणून दुसऱ्यावर प्रभुत्व चालवीत नाही, असे लक्षात आल्यास त्यांच्याशी गोड वागून त्याचा अहंकार खाली आणा, त्यांच्याशी प्रेमाने वागा, म्हणजे त्याचा अहंकार खाली येईल. काहीही करुन आदर्श संबंध प्रस्थापित करा. ते अगदी सोपे आहे.

- एक-दुसऱ्यांशी परिपूर्ण संबंध असावेत. स्वत:शी मात्र तुमचे संबंध कठोर असावेत. स्वत:ला स्पष्टपणे बजावायला हवे की ' मला माझे हे शरीर परमेश्वराला अर्पण करायचे असेल तर स्वत:ल परिपूर्ण करायला हवे ' दुसरे म्हणजे दुसऱ्यांशी आदर्श संबंध बनवायलाच हवेत. सहजयोग्याचे दुसऱ्या सहजयोग्याबरोबरचे नाते महान असते. सर्वात मोठे नाते ते आहे तुमच्या बहिणीशी, भावाशी तुमचे संबंध आदर्श असावेत.

१४) प्रत्येक आठवडयात कमीत कमी एका सार्वजनिक कार्यक्रमात आपण भाग घ्यायला हवा.

- एका बाजूला मला मुर्ख लोक आहेत असे दिसते आणि दुसऱ्या बाजूला अनेक प्रामाणिक साधक आहेत. त्यांच्या पर्यंत कसे पोहचायचे. चिखलाने झाकला गेलेला हिरा असावा असे ते आहेत आणि चिखल तरी किती आहे. चिखलात रुतलेला हिरा बाहेर काढण्यासाठी, अज्ञानाच्या खाणीत खोलवर जावे लागते व त्या ठिकाणी चिखलात हरवलेला हिरा सापडतो.
- मला अशी काळजी वाटते की हा चिखल त्यांच्या बुध्दीला, त्यांच्या दृष्टीला व जे काही इतर त्यांच्याकडे आहे त्या सर्वांना इतका भरुन टाकेल त्यांना कधीच साक्षात्कार मिळणार नाही, ते घालवून बसतील.- (श्री माताजी १९.१.८४)
- सहजयोग जाहिराती देण्याने अथवा माझ्या फोटोने कार्यान्वित होणार नाही. तो कार्यान्वित होणार आहे तुमच्या कार्य करण्याने, जबाबदारी घेण्यामुळे आणि सहजयोगाला उचलून धरण्याने , सहजयोगाचा प्रसार करुन त्यास प्रस्थापित करणे, ही तुमची जबाबदारी आहे - (श्री माताजी, विराट पूजा.)

१५) आपल्यामधील कमतरतांच्यासाठी कोणी सबबी सांगू नये.

- तुम्ही चुकीचे काम करता तेव्हा तुमच्यापैकी अनेक जण म्हणतील- माझ्या डाव्या स्वधिष्ठानवर पकड होती-काही म्हणतील -माझ्यात भूत होते-तर आणखी काही दुसऱ्या कशाला तरी दोष देतील.तुम्ही कशालाही दोष द्या, पण कोणी तुम्हाला विचारले आहे? तुम्हीच स्वत:ला विचारा, तेव्हा माझी भक्ति म्हणजे स्वत:ला सामोरे जाऊन, आपण काय करतो ते स्वत:च पहावे-

(श्री माताजी २८.५.८५)

- वर्तमानात रहाण्याचा प्रयत्न करा. वर्तमानापासून पलायन करु नका, वर्तमानाला सामोरे जा. अपराधी वाटून घेऊ नका. अथवा भूताला दोष देऊ नका. दोन्ही तुम्हाला वर्तमानापासून दूर नेतील. संपूर्ण निसर्ग, ईश्वरी शक्ति, कित्येक युगांची तुमची इच्छा- प्रत्येक गोष्ट तुमच्या बाजूला आहे. समय आला आहे, तुम्ही आहात, आपल्याला काय करायचे आहे?हे पहा.
- जेव्हा स्वत:स चुकीचे वागताना पहाल तेव्हा स्वत:लाच शिक्षा करा. ईश्वराने तुम्हाला शिक्षा करण्यापेक्षा तुम्हीच स्वत:ला शिक्षा करा. कारण ईश्वराची शिक्षा फार कडक असते. परंतु अपराधी वाटून घेऊ नका कारण तुम्ही कोणतीही चूक केली नाही.



(श्रीमाताजी २८.७.८५)

१६) आपण इतरांबद्दल मतपदर्शन करु नये.

- माणसाची चांगली बाजू का पाहू नये? वाईट बाजू पाहून ती आपल्याला सुधारता येत असल्यास ठीक आहे. पण त्यांत सुधारणा करणे शक्य नसल्यास तुम्ही स्वत:च वाईट होता. सुधारणा करता आल्यास फारच चांगले.
- लोक नेहमी म्हणतात,-मी नसते ते केले- परंतु तुम्ही दुसरे काहीतरी केले जे इतर करणार नाहीत.
- दुसऱ्याची परीक्षा करतेवेळी प्रथम स्वत:ची परीक्षा करायला हवी, हे समजले पाहिजे. कशाच्या आधारावर तुम्ही परीक्षा करता? तुमचा अहंकार आणि मन हा दोष सगळीकडे आहे, हे मी पाहिले आहे. येथून पुढे तो अजिबात असू नये.
- तुम्ही एक दुसऱ्याचे दोष पहाणार नाही तर चांगले गुण पहाणार आहात.-

(श्री माताजी २८.७.८५)


- जेव्हा सहजयोगीच सहजयोग्यांवर टीका करताना मी पाहते त्यावेळी मला आश्चर्श वाटते, कारण तुम्ही एकाच शरीराचे अंग प्रत्यंग आहात. मी टीका करु शकते ते ठीक आहे. पण तुम्ही का करता? तुम्ही फक्त एक करायचे की एक दुसऱ्यांवर प्रेम करायचे. ख्रिस्तांनी हे तीन वेळा सांगितले, मी आतापर्यंत एकशेआठ वेळा सांगितले आहे, की तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. तुमच्यामधील कारुण्य व्यक्त करण्याचा हा एकच मार्ग आहे. मी जर तम्हाला केव्हा तरी प्रेम दिले असेल तर तुम्हाला इतरांबद्दल पेशन्स (धीर )व प्रेम असायला हवे.

( श्री माताजी २८. ७.८५)

- दुसऱ्याची परीक्षा करु नका, म्हणजे तुमची परीक्षा होणार नाही, तुम्ही जशी दुसऱ्याची परीक्षा कराल तशीच तुमचीही होईल-

(श्री येशू)

- इतरांवर सरकॅस्टीक(छद्मीपणाने)मत प्रदर्शन करु नये. हा असाच आहे, तो तसाच आहे, एकमेकांवर असे मत प्रदर्शन करणे मला अजिबात आवडत नाही.तुम्ही सर्वांनी एकमेकांना आदर दिला पाहिजे. एखादी व्यक्ति गर्विष्ठ अथव स्वार्थी असेल तर ते लगेच लक्षात येईल व त्याच्यावर उपाय केले जातील. म्हणून तुम्ही काही मत प्रदर्शन करु नका. सार्वजनिक कार्यक्रमाचे वेळी हे होते असे मी असे ऐकते





ते फार वाईट आहे. -

(श्री माताजी २४.३.८१)

१७) आपण निरर्थक गप्पा मारु नये.

- काही सहजयोगिनींना सतत बोलण्याची वाईट सवय आहे, त्या सारख्या बोलतच राहतात; हे फार वाईट आहे. त्यांच्यात अद्याप बरेच काही कमी आहे असे दिसते. केवळ साड्या नेसून किंवा कुंकु लावून कोणी सहजयोगी होत नाही. सर्वात प्रथम तुमच्यात गुरुत्व आहे का? आवश्यक असेल तेव्हाच तुम्ही बोलले पाहिजे, काही स्त्रिया सतत बोलत राहतात, काही तरी गोष्टी; भाषण देणार नाहीत. कुरबूर करायची असेल तर तिथे त्या जातील, म्हणून या बाबतीत तुम्ही काळजी घ्यायला हवी. एखादी व्यक्ति टीका करीत असेल तर तुम्ही शांत रहा. ही शांति प्रस्थापित व्हायला हवी. याशिवाय मी पाहिले आहे की माझ्या उपस्थितीतही लोक आपपसात बोलतात, हे फार चूक आहे. दुसऱ्याविषयी चर्चा करण्याचे तुम्हाला कोणतेही कारण नाही. आपण आपल्या एका हाताच्या वागण्याची दुसऱ्या हाताशी चर्चा करतो का? लग्नाचे काय झाले, ह्याचे काय झाले, त्याचे काय झाले; एका दृष्टीने तुम्ही लग्न झालेले लोक नाहींत, तुमचे सहजयोगाशी लग्न झाले आहे-

(श्रीमाताजी ८.७.९०)

१८)आपण वैयक्तिक गोष्टींना सहजयोगाच्या कार्याच्या आड आणु नये

- मला आता दिसते आहे की आणखी एका प्रकारची गुलामगिरी आहे. ती म्हणजे स्वार्थीपणाची, आत्मकेंद्रितपणाची मला हा ऐषआराम हवा, मला हे हवे, ते हवे, मला मजा यायला हवी इ. तुम्हाला आनंद व्हायला हवा, नाहींतर याला कांहीं महत्त्व नाही. म्हणजे या सर्वातून तुम्हाला काही तरे वाटायला हवे.
- लोक काय करतात ते मला समजतच नाही. कोणत्या प्रकारचे कर्म ते करीत आहेत, जे ध्येय आहे त्या ध्येयाची उंची त्यांना गांठता येत नाही, त्या पातळीवर त्यांना पोहोचता येत नाही. तुम्हाला काय मिळवायचे आहे? तुम्हाला सर्व जगाला वाचवायचे आहे. म्हणून आता उठा, तुमच्या लहान आणि कमकुवत मनाच्या बाहेर पडा; इतकी उंची गाठा की तिथे तुमच्या लक्षांत येईल की तुम्हाला सर्व मानवतेला वाचवायचे आहे. तुम्हाला जर ते जाणवले नाही तर तुम्ही सहजयोग सोडावा हे बरे. सहजयोग येऱ्या गबाळ्याचे काम नाही. -

(श्री माताजी २७.५.८५)

- लक्ष्मी सांभाळून ठेवण्याची जबाबदारी आपण घेतली नाही तर भौतिक विश्वात खोलवर शिरणे सहजयोगाला अवघड जाईल कारण आश्रम कोण बांधेल आणि कार्यक्रम कोण घेईल, नेहमी सहजयोगात याना त्या कारणांसाठी पैसे देण्यास सांगितले जाते आणि लोक कुरकुर करतात. परंतु ते लोक केवळ स्थूल अथवा भौतिक स्वरुपाच्या नाटकांकडेच पाहतात. त्याचा सूक्ष्म अर्थ पहात नाहीत. तो म्हणजे लक्ष्मी विष्णू तत्त्वाकडेच लक्ष द्यायचे, त्यामुळे आपल्या आईच्या कृपेने प्राप्त झालेल्या प्रकाशित आत्म्यामुळे संपूर्ण विराटाला प्रकाशित करायचे आहे. सर्व भौतिक प्रकाशित करायला हवे, कारण आपण शुध्द आत्मा आहोत -

(श्रीमाताजी २१.५.८४)

- आपल्याला इतके हवे असते पण आपल्या गरजा इतक्या थोड्या असतात.....प्रकाशित व्यक्तीला काहीच आवश्यक नसते.

(श्री बुध्द)

१९) चैतन्य लहरींचा सतत वापर करावा.

- तुम्ही सतत लक्षात ठेवायला हवे की आपण आता साक्षात्कारी जीव आहोत. आपल्याला चैतन्य लहरी प्राप्त झाल्या आहेत. परीक्षा करण्याचा हाच एक मार्ग आहे. याच पध्दतीने समजावून घ्यायचे आहे. दुसऱ्यांना समजू शकण्याचा चैतन्यलहरी हा एकच मार्ग आहे दुसरा कोणताही नाही. तुम्हाल वाटेल व्यक्ति दिसायला चांगली आहे, वागण्यात लाघवी आहे, पण विचारातून कदाचित साप बाहेर येईल.
- म्हणून माणसाला पारखण्याचा चैतन्य लहरी हाच एक उत्तम उपाय आहे. तुम्हाला काय समजले किंवा वरवर पारखण्याच्या पध्दति नव्हे, अजूनसुध्दा दुसऱ्याला पारखण्यासाठी आपण अनेक प्रकारे आपल्या मनावर झालेल्या संस्काराचा उपयोग करतो. हे संस्कार आपल्या जजमेन्टला, आपल्या पारखण्याला एकांगी स्वरुप देतात. म्हणून चैतन्य लहरीच पाहणे हा उत्तम उपाय आहे. चैतन्य लहरींच्या माध्यमातून काय घडत आहे ह्याचे खरे ज्ञान मिळेल.-

(श्री माताजी १६.५.८७)

- बौध्दिक संकल्पनाच्या बाहेर या कारण त्यामुळे तुम्हाला वास्तवाचे ज्ञान होत नाही, जे काही तुमच्याकडे असते ते बौध्दिक स्वरुपाचे ज्ञान असते. खरे ज्ञान तुमच्या अंतर्यामीचा अविभक्त भाग असतो.

(श्री माताजी २७.५.८५)



२०) आश्रमाचे पावित्र राखले पाहिजे.

- आपण श्री माताजींच्या घरांत राहतो हे कायम लक्षात ठेवावे. आश्रमासंबंधी केव्हाही तक्रारी करु नयेत. आश्रम हे तुमच्या आईचे मंदिर आहे. हे स्थान मंदिरासारखेच असायला हवे. आश्रमवासियांनी आणि बाहेरुन येणऱ्यांनी त्याची काळजी घ्यायला हवी. जरी तुम्ही तुमच्या मुलांना घेऊन आलांत तरी त्यांना प्रत्येक खोलीत जाऊ देऊ नका.
- आश्रमात कोणत्याही प्रकारे उपद्रव निर्माण करु नय, आश्रम शांति व आनंदाचे स्थान असायला हवे.
- ही वास्तु मंदिरासारखी जतन करायला हवी. येथे रहाणाऱ्यांनी लक्षात ठेवावे की ते इथे ट्रेनिंगसाठी राहिले आहोत, याचा सुविधा म्हणून उपयोग करु नये

(श्री माताजी २५.३.८१)

२१) गहनता मिळवण्याचा सतत प्रयत्न करा

- सहजयोग हा विषय अंतर्यामी फार खोलवर जायला हवा. कारण सहजयोग जर तुम्हाला समजला असेल- तुम्हाला समजला की नाही अथवा तुम्ही जाणले आहे की नाही हे मला माहित नाही- तर सहजयोग आपण अनुभवातून शिकतो तुम्ही अनुभव घ्या व मग विश्वास ठेवायचा. मी जे सांगते आहे त्याचा परिणाम तुमच्या मनावर होतो असे नव्हे तर तुम्ही स्वत: अनुभवता व शिकता

(श्रीमाताजी २१.५.८४)

- आपली सवय व समय यांच्या बाबतीत आपण उदार असावे. तुम्हाला काय प्राप्त करुन घ्यायचे आहे, ते स्पष्टपणे लक्षात घ्या. सहजयोगी म्हणून जीवनात तुम्हाला काय मिळवायचे आहे, ते नीट समजावून घ्या. आता तुम्ही परिवर्तित लोक आहात. जे स्वत:च्या मिळकतीच्याच मागे लागले आहेत, अशा प्रकारचे लोक तुम्ही नव्हेत, तुमच्या वैयक्तिक जीवनाची आरोग्याची, फार काळजी घ्यावी लागते, असेही लोक तुम्ही नव्हेत.तुम्हाला फार करीयरची काळजी असेल माझी नोकरी कशी चांगली राहील इ. तर तुम्ही सहजयोगाच्या बाहेर जावे हे बरे, आम्हाला त्याचा काही उपयोग नाही.
- आपण स्वत:शीच भांडू शकत नाही. केवळ सातत्याने सहजयोग साधना करुन, जोडेपट्टी करणे, पाण्यात पाय ठेऊन बसणे, ध्यान करणे इ. काळजी घेऊन आत्मा आणि कुण्डलिनी यांच्यावर सर्व काही सोपवायचे. ते आपल्यासाठी सर्व कांही घडवून आणतात. शिवाय, सर्व काही आपोआप होत असल्याने, अहंकार निर्माण होण्यास अथवा बौध्दिक कार्यास वाव राहू नये.-

(श्रीमाताजी २१.५.८४)


- काही लोकांच्या मनात - माझी प्रिय माणसे, माझी बायको हे, ते वगैरे सतत घोटाळत असते. तुम्ही येथे का आलात कशा करता आलात? तुम्ही या सर्वांच्यावर उठू शकत नसाल, तर मला तुम्ही मदत करु शकत नाही. तुम्ही कणखर लोक व्हायला हवे. तुम्ही पराक्रमी, ध्येयवादी आणि उदात्त विचाराचे असे लोक व्हायला हवे.-

(श्री माताजी २८.७.८५)

- तुमची आई बोलण्यात पारंगत आहे आणि ती तुमच्याशी बोलते, परंतु या सर्वांना तुम्ही बुध्दीने चिकटून बसू नका. उदा. श्री माताजी असे म्हणाल्या, सर्व जण उत्साहाने चर्चा करतात हे होते, ते होते; परंतु माझे बोलणे तुमच्या अंतरंगाचा अविभक्त भाग होऊन राहात नाही, सगळ्या लोकांना सगळी माहिती असते परंतु अंतर्यामी काहीच नसते.
- माझी मुले असणे सोपे नाही, कारण तुम्ही काय करता हे मला समजते, तुमची प्रत्येक गोष्ट मला माहित असते. मी तुम्हाला सुधारत असते ते तुम्ही जाणताच, परंतु जेव्हा तुम्ही मला धरुन राहता तेव्हा असे दिसते की ज्यांनी उन्नत होण्याचा निश्चय केला आहे आणि आपल्या अंतर्यामयी परिर्वतन करुन अधिक चांगल्या स्थितीमध्ये उत्क्रांत होण्यात प्रयत्नशील असणाऱ्यापैकी तुम्ही आहात. सहजयोगी असणे सोपे नव्हे, की तुम्ही पैसे दिलेत आणि सदस्य झालात आणि माताजींचे शिष्य झालांत. माझे शिष्य झाल्यावरही तुम्हाला काही परीक्षांमध्ये उतरावे लागते आणि त्यासाठी मेहनत करावी लागते. तुमच्या कुटुंबामध्येच राहून पुष्कळ तपस्या करावी लगते.

●●●

*Thank You Mother*








TEATRO DELLE FONTI









